...गूढ गूढ आणि अद्भुत !

मनुष्याला अद्भुताचे वेड विलक्षण आहे. अद्भुत व गूढ गोष्टीकडे तो चटकन् आकर्षिला जातो. अगदी पाळण्यात असल्यापासून या अद्भुताचे त्याला आकर्षण असते. पाळण्याच्या वर बांधलेल्या रंगीबेरंगी फुग्यां- मध्ये, गोल गोल फिरणाऱ्या भिंगरीमध्ये, कशीही फेकली तरी मागे पुढे डोलत पुन्हा पायांवरच उभ्या राहणाऱ्या बाहुलीमध्ये त्याला अद्भुताचा आढळ होतो आणि तो तासन् तास विस्फारित नेत्रांनी त्या गोष्टींकडे टकमक पाहत राहतो ! पुढे कालांतराने तो मोठा होतो, त्याच्या बुद्धीची वाढ होते, नवे नवे अनुभव तो घेतो आणि मग ज्या गोष्टींमध्ये त्याला एकेकाळी अद्भुताचा आढळ होत होता त्या गोष्टी त्याला पूर्वीप्रमाणे अद्भुत वाटे- नाशा होतात. परंतु त्याचवेळी दुसऱ्या काही गोष्टींमध्ये त्याला या अद्भुताचा साक्षात्कार होतो आणि तो, हे कसे घडले असावे ? अशासारख्या निरूत्तर करणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत राहतो ! यापेकी काही प्रश्नांची उत्तरे भौतिक शास्त्रांच्या आधारे त्याला एखाद्या वेळी मिळतातही. परंतु काही घटना मात्र अशा असतात की, त्या कशा घडल्या याचे उत्तर कोणतेही भौतिक शास्त्र (Science) देऊ शकत नाही. कदाचित शास्त्र हळूहळू आणखी प्रगत होईल व त्यांपेकी काही घटनांचा कार्यकारण भाव त्याला सांगता येईल प्रयोगांनी सिद््धही करून दाखविता येईल. परंतु तरीही काही घटना अशा उरतीलच की त्या कशा घडल्या याचे उत्तर देण्यात प्रगत भौतिक  शास्त्रेही असमर्थ ठरतील ! याचे कारण या जगात होणारे काही चमत्कार तरी निश्चितच एक प्रकारच्या अदृश्य अशा देवी शक्ती- मुळे घडत असतात, आणि त्या शक्तीचे मोजमाप भौतिक शास्त्रांच्या कक्षेत बसत नाही ! सिद््धीचेच उदाहरण घेऊ या. पातंजल मुनींनी आपल्या योगशास्त्राच्या ग्रंथात वेगवेगळ्या सिद्धींची वर्णने केलेली आहेत व त्या प्राप्त करून घेण्याचे मार्गही त्यांनी सांगितले आहेत. ` प्रत्ययस्य परचित्त ज्ञानम् ।। 3-19 ।। याचा अर्थ, दुसऱ्याच्या देहावर असणाऱ्या चिन्हांवर संयम केला असता त्याच्या मनात काय चालले आहे ते कळते. आता हे कसे घडते याचे कारण कोणत्याही भौतिक शास्त्राला सांगता येणार नाही. एवढेच नव्हे तर दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखण्याचे यंत्र काढण्यातही अजून भौतिक शास्त्राला यश मिळालेले नाही ! पातंजल मुनींचे आणखी एक सूत्र पुढीलप्रमाणे आहे. ते म्हणतात, `कायाकाशयोः संबंधसंयमाल्लघुतूलसमापत्तेश्चाकाशगमनं ।' ।। 3-42।।. म्हणजे, पंचमहाभूतांचे शरीर व त्यास आश्रय देणारे आकाश यांचे ठायी संयम केला असता आकाशगमन सिद्धी प्राप्त होते ! भौतिकशास्त्रज्ञांनी विमान,हेलिकॉप्टर इत्यादींचा शोध लावून ही आकाशगमनाची सिद्धी प्राप्त करून घेतली असली तरी विमानासारख्या जड वस्तूंचाच उपयोग त्यासाठी करावा लागतो. शरीर

हलके किंवा वायुरूप करून आकाशगमन साध्य करण्याची युक्ती भौतिकशास्त्रज्ञांना अजून तरी शोधून काढता आलेली नाही ! अध्यात्ममार्गात विशिष्ट प्रगती केलेल्या लोकांनाही अनेक देवी अनुभव येत असतात. उदाहरणार्थ, पुढील घटना आगाऊ समजणे, निरनिराळे नाद ऐकू येणे, बोललेले शब्द खरे होणे यांसारखे किंवा याच्याहीपेक्षा पुष्कळच वरच्या थरातले अनुभव या मंडळींना कधीमधी येत असतात. या अनुभवांची उकल भौतिकशास्त्रांना करता येत नाही. याचे कारण `योगसिद्धी आणि ईश्वर साक्षात्कार' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत वे. सोनोपंत दांडेकर यांनी लिहिल्या- प्रमाणे हे अनुभव, `यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह' अशा प्रकारचे असतात. म्हणजेच ते देवी असतात ! जड किंवा भौतिक शास्त्रांच्या मर्यादेत ते बसू शकत नाहीत, पुढेही कधीकाळी ते बसविता येतील असे वाटत नाही. कारण ते बुद्धीच्या पलीकडचे आणि अतींद्रिय असे असतात. त्यासाठी कदाचित् एखादी नवी शास्त्रशाखा जन्म घेईल. अशाप्रकारे, विश्वात घडणाऱ्या सर्वच चमत्कारांचा उलगडा मनुष्याला करता येत नाही. या ठिकाणी एका पाश्चात्त्य तत्त्वज्ञाचे एक मोठे सुंदर वाक्य मला आठवते. तो म्हणतो, `The Universe divided by reason leaves the remain- der ' म्हणजे- `विश्वाला बुद्धीने भागले असता बाकी शिल्लक राहते !' मनुष्याच्या अफाट बुद्धीच्या आवाक्यात न येणाऱ्या कितीतरी अद्भुत चीजा या पृथ्वीतलावर व पृथ्वीतलाच्या सभो- वार आहेत. म्हणूनच चंद्रावर पाऊल टाकून गगनाला गवसणी घालू पाहणाऱ्या मानवी मेंदूच्या अफाट बुद्धिसामर्थ्याचे तोंड फाटे- पर्यंत कौतुक करतानादेखील असेच म्हणावे लागते की मनुष्याला जेवढे समजले आहे त्यापेक्षा त्याला न समजलेला भाग अनंत पटींनी मोठा आहे ! आणि तो तसा असण्यातच त्या महान् ईश्वरीशक्तीचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे ! प्रस्तुत पुस्तकात मी स्वतः अनुभवलेले, पाहिलेले, वाचलेले व ऐकलेले असे अनेक अद्भुत व गूढ अनुभव वाचकांपुढे ठेवले आहेत. यांमध्ये कित्येक अनुभव असे आहेत की त्यांचा उलगडा खूप विचार करूनही होऊ शकत नाही. उदाहरणार्थ, `भविष्यकथनाची सिद्धी ' या लेखात पुढे होणाऱ्या व पूर्वी घडून गेलेल्या घटना बिनचूक सांगणाऱ्या काही लोकांची माहिती आहे. त्यांना हे भूत, भविष्याचे नेमके ज्ञान कसे होते ? या घटनांचे स्पंद (Vibrations) त्यांना नेमके कसे पकडता येतात ? तसेच, काही वेळा त्यांचे भविष्य साफ चुकते ते कशमुळे ? कोणत्या त्रुटीमुळे ? श्रीगणेश अथर्वशीर्षाच्या सततच्या पारायणामुळे भविष्यकालीन घटना आगाऊ कशा समजतात ? त्याचे काय शास्त्र आहे ?गायत्री मंत्रात एवढे सामर्थ्य कशामुळे आले ? असे अनेक प्रश्न वाचकाच्या मनात निर्माण होतील आणि त्याच्या विचारांना नवी दिशी प्राप्त होईल. याप्रश्नांची नेमकी उत्तरे शोधताना त्याच्या मनाची ठेवणही कदाचित् अधिक आस्तिक होईल. दुसरा, ` चमत्कारांचे युग संपलेले नाही' असा एक लेख आहे. त्या के. मामांना भेटलेले व नंतर आपोआप अदृश्य झालेल्या दोघा व्यक्तींची माहिती आहे. हा

चमत्कार कसा घडला असावा ? तसेच, `प्रार्थने' त सामर्थ्य कशा- मुळे निर्माण होते ? अश्वत्थामा आज हजारो वर्षे तेच शरीर टिकवून ठेवून रानावनातून कसा फिरू शकतो ? हे प्रश्न वाच- काच्या मेंदूला निश्चितच खाद्य पुरवतील. या पुस्तकात योगी लोकांच्या अद्भुत योगसामर्थ्याविषयी दोन लेख आहेत. त्याच- प्रमाणे ब्रम्हसमंध आणि पिशाच्च सृष्टी याबद्दलही दोन लेख आहेत. पिशाच्चसृष्टी हा अश्मयुगापासून मनुष्याच्या कुतूहलाचा विषय बनलेला आहे, एकेकाळी पिशाच्च- कथांची `भाकडकथा' म्हणून हेटाळणी होत असे. परंतु पिशाच्च सृष्टीचे अस्तित्व आता पुराव्यानिशी सिद््ध झाले आहे. आता पिशाच्चांचे फोटोदेखील घेता येतात कालांतराने पिशाच्च सृष्टीतील देखाव्यांची फिल्म- देखील घेता येईल व पिशाच्चांच्या हालचाली, त्यांचे देनंदिन जीवन इत्यादी गोष्टी एखाद्या चित्रपटाप्रमाणेच पाहता येतील ! कदाचित् काही शक्तिशाली यंत्रांच्या सहाय्याने त्यांचे बोलणेही `टेप' वर रेकॉर्ड करता येईल !! याच पुस्तकाच मृत्यूच्या वेळी काय घडते यावर किंचित् प्रकाश टाकणारा, `अण्णांना खराखुरा देवदूत भेटला'` हा लेख आहे. मनुष्याच्या मृत्यूच्यावेळी अदृश्य लोकातले मार्गदर्शक (किंवा देवदूत) मनुष्याकडे येतात व त्याला मृत्यूनंतरच्या अज्ञात अशा प्रातांत प्रवास करताना मार्गदर्शन करतात ही गोष्ट संशोधकांनी आता सिद्ध केली आहे. या संदर्भात पुण्यामध्ये घडलेली एक सत्यकथा या लेखाच्याद्वारे वाचकांपुढे मुद्दाम मांडली आहे. त्यानंतर `तीर्थ-मंत्रातील सामर्थ्या' बाबत एक लेख आहे. अलीकडची तरूण पिढी काही अपवाद वगळता तीर्थ, अंगारा इत्यादी गोष्टींवर चटकन विश्वास ठेवायला तयार होत नाही. या गोष्टींची संभावना हे लोक `बुवाबाजी' या सद- रात करतात. परंतु खरोखरीच्या सत्पुरूषाने दिलेल्या तीर्थ-अंगा- र्‍यात एक प्रकारचे अगाध सामर्थ्य निर्माण होते ही गोष्ट `तीर्थ- मंत्रातील सामर्थ्य' या लेखावरून वाचकांच्या लक्षात येईल ! माझ्या आयुष्यात मला आलेल्या अनेक आश्चर्यकारक अनु- भवांपेकी काही गूढ व अद्भुत अनुभव मी या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. या सर्व अनुभवांत अखेरच्या लेखात, म्हणजेच `होणारे न चुकेल' या लेखात वर्णिलेला अतींद्रिय अनुभव मला विशेष आश्चर्यकारक व इतर सर्व अनुभवांपेक्षा अधिक महत्त्वाचा वाटतो. `दिव्य श्रुती" हा प्रकार मी तोपर्यत केवळ पुस्तकातूनच वाचीत होतो. परंतु त्याच्या प्रत्यक्षच अनुभव मला मिळाला. व तो अनुभव एका दुःखकारक प्रसंगाशी निगडीत असूनही एक `दिव्य' अनुभव म्हणून मला नेहमीच मोठा मोलाचा वाटत आला आहे व पुढेही तो तसाच वाटत राहील ! प्रस्तुत पुस्तकात जे गूढ, व अद्भुत व अनाकलनीय अनुभव मी वाचकांपुढे ठेवले आहेत ते तसे ठेवताना कोठेही अतिशयोक्ती होणार नाही, याची काळजी मी शब्दागणिक घेतली आहे. यांचे कारण, हे पुस्तक म्हणजे एखादी अद्भुत कादंबरी किंवा गूढ भय- कथांचा संग्रह नव्हे याची मला पूर्ण जाणीव आहे ! प्रत्येक मनु- ष्याने आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन केले तर कधी ना कधी असे गूढ व अद्भुत

अनुभव आपल्यालाही आल्याचे त्याच्या लक्षात येईल. कारण हे जग अनंत चमत्कारांनी भरलेले आहे आणि आपल्या आयुष्यातही अनेक गूढ व अनाकलनीय गोष्टी भरलेल्या आहेत. त्याकडे डोळसपणे पाहणे व त्या कशा घडल्या असाव्यात याचा कार्यकारणभाव समजावून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रत्येकवेळी यश मिळेलच असे मुळीच नाही. परंतु ज्यावेळी यश मिळणार नाही त्यावेळी त्या घटनांमधील अद्भुतता अधिकच वाढलेली असेल आणि अद्भुत रसाचे सेवन करण्यातही काही आगळाच आनंद असतो ही गोष्ट मनाला पटेल ! या ग्रंथाची मी हीच फलश्रुती मानतो ! 1806 सदाशिव पेठ देशमुखवाडी,पुणे 30 विश्वनाथ केशव फडके तुमच्या-माज्यासारख्याच्या आयुष्यातही कित्येक वेळा वेलिक्षण चमत्कार घडत असतात, मात्र त्यांची संगती नेहमीच लावता येत नाही. पण म्हणून ते खोटेच म्हणता येतील का ? 2 चमत्कारांचे युग संपलेले नाही ! पुराणकथांतून आपण अनेक चमत्कार वाचतो. संत किंवा साधुपुरूष यांच्या चरित्रात तर चमत्कारांचाच भाग अधिक आढळतो. किंबहुना चमत्कार केल्याशिवाय एखाद्याला संत किंवा साधुपुरूष मानायला समाज तयारच नसतो ! परंतु या महापुरूषांना त्या चमत्कारांविषयी कुणी विचारावे तर ते नम्रतेने एवढेच सांगतात, की हे चमत्कार आम्ही घडविले नाहीत, ते आपो- आप घडले ! या विधानात त्या साधुपुरूषांचा केवळ विनय आहे असे नव्हे, तर वस्तुस्थितीदेखील तशीच आहे. `चमत्कार' मुद्दाम केले जात नाहीत, ते आपोआप घडतात. ही झाली साधुपुरूषांची गोष्ट. परंतु तुमच्यामाझ्यासारख्या सर्वसामान्य मनुष्याच्या आयुष्यातही कित्येकदा विलक्षण चमत्कार घडत असतात. ते कसे घडले व का घडले याची नीटशी संगती आपल्याला कधीच लावता येत नाही, व त्यामुळेच ते `चमत्कार आहेत ही गोष्ट आपल्याला मानावीच लागते ! सर्वसामान्य मनुष्यापेक्षाही साधनामार्गात ज्यांची थोडीबहुत प्रगती झाली आहे अशांच्या आयुष्यात कधीमधी असा एखाद-दुसरा चमत्कार हमखास घडतो ! कदाचित ती महान ईश्वरी शक्ती आपल्या अस्तित्वाची `झलक' अशा प्रकारे दाखवून त्या साधकाचा साधनामार्गावरील विश्वास दृढ करीत असावी असे मला वाटते. कारण यातले काही चमत्कार सहज न घडता मुद्दाम घडवून आणल्यासारखेही दिसतात ! आज या लेखात माझ्या वडिलांच्या आयुष्यातील घडलेल्या एका विल- क्षण चमत्काराची हकीकत मी वाचकांपुढे मांडणार आहे. आमचे वडील अतिशय धार्मिक वृत्तीचे होते. श्रीगुरूचरित्र आणि श्रीदासबोध या ग्रंथावर त्यांची विलक्षणनिष्ठा होती. देवपूजेनंतर श्रीगुरू- चरित्र आणि रात्री झोपण्यापूर्वी दासबोधातील काही ओव्या ते रोज न चुकता वाचीत असत. त्यांच्याजवळ श्रीब्रम्हचेतन्य गोंदवलेकर महाराज यांच्याजवळची एक रूद्राक्षाची माळ होती. त्या माळेवर त्यांचा रामनामाचा जप नियमाने होत असे. ते आमचे वडील असले तरी आम्ही सर्व मुले त्यांना `मामा' म्हणत असू. मामांचे वागणे, बोलणे एखाद्या संताला शोभेल असेच

होते. भव्य तेजस्वी शरीर आणि पाणीदार डोळे ही मामांची ठळक वेशिष्ट्ये होती. त्यांचे बोलणे मोठे मिठ्ठास होते. एखादी गोष्ट रंगवून,खुलवून सांग- ण्याचे कसब त्यांच्याइतके क्वचितच कुणाजवळ असेल ! ब्रम्हचेतन्य महा- राजांची टपोऱ्या रूद्राक्षांची माळ गळ्यात घालून, डाळिंबी रंगाचे सोवळे नेसून देवपूजेत रंगून गेलेल्या मामांची ती भव्य गोरीपान मूर्ती अजूनही माझया डोळ्यापुढे जशीच्या तशी उभा राहते व मी त्या मूर्तीला भक्ति- भावाने वन्दन करतो. `श्रीराम' हे मामांचे उपास्य देवत होते, तर श्रीसमर्थ रामदासस्वामी आणि लोकमान्य टिळक ही त्यांची आदर्श श्रद्धास्थाने होती. रोज सकाळी व संध्याकाळी घराबाहेर पडताना या दोघा महापुरूषांच्या भव्य फोटोंना वंदन केल्याशिवाय ते कधीही राहत नसत. सकाळी `केसरी ' वाचण्यापूर्वीही दोन सिंहाच्या मधोमध छापलेल्या लो. टिळकांच्या गंभीर फोटोला हात जोडून नमस्कार केल्याशिवाय त्यांचे समाधान होत नसे. आज असे निष्ठावान लोकही राहिले नाहीत आणि त्यांच्यावर निष्ठा ठेवावी असे आदर्श महापुरूषही उरले नाहीत. लघुनिबंध,लघुकथा, लघुनाट्य असा `लघु' चा जमाना सुरू झाला व जीवनातील भव्यदिव्य सारेच आपण विसरून गेलो ! असो. या सर्व पार्श्वभूमीवर मी के. मामांच्या आयुष्यात घडलेला एक चमत्कार आता सांगतो. ही घटना निश्चित कोणत्या तारखेला घडली हे मला ठाऊक नाही, किंबहुना त्या घटनेचे सालही मला सांगता येणार नाही. कारण ती घटना घडली तेव्हा मी वयाने फार लहान होतो. परंतु आपल्याला सन किंवा तारीख या तपशिलात जाण्याचे कारण नाही. आपण फक्त काय चमत्कार घडला तेवढे पाहणार आहोत. आमच्या मामांना अधूनमधून धार्मिक क्षेत्री जाण्याची ओढ लागत असे. व मग कधी आंळदी,कधी शिर्डी,कधी गाणगापूर तर कधी पंढरपूर अशी त्यांची फिरती होत असे. ते रेल्वेत नोकरीला असल्याने त्यांना वर्षातून दोन वेळा `फ्री पास' मिळत असत व त्यांचा उपयोग करून ते एखाद्या वेळी दूर बनारसपर्यतही यात्रा करून येत असत ! रेल्वेतील लोकांना कितीही लांब प्रवास करण्याचा कधीच कंटाळा येत नाही असे मी पाहिले आहे. मामाही त्याला अपवाद नव्हते. एकदा मामा असेच पंढरपूरला गेले होते. पंढरपूरला आमच्या आईचे मामा असतात. या मामांकडेच आमचे मामा उतरले होते. पंढरपूरला एक राममंदिर आहे. त्या मंदिरातील पूजेअर्चेची व्यवस्था आमच्या आईच्या मामांकडे असे. त्यांची राहण्याची जागाही तेथेच होती. पंढरपूरच्या मुक्कामात एक दिवस दुपारी आमच्या मामांना दासबोध वाचण्याची इच्छा झाली. त्यांनी आपली ही इच्छा आईच्या मामांजवळ, म्हणजे गोखल्यांजवळ बोलून दाखविली. गोखले म्हणाले,`तुम्ही वरच्या मजल्यावर जाऊन निवांत वाचीत बसा. अगदी शांत जागा आहे ती तिथे कुणीसुद्धा त्रास द्यायला येणार नाही.' मामांना ती कल्पना एकदम पसंत पडली. कारण मंदिराचा वरचा मजला खरोखरच शांत व निवांत होता. त्यामुळे रेशमी कापडात गुंडाळलेला `दासबोध' घेऊन मामा चटकन वर गेले. वरच्या

मजल्यावर खरोखरच कुणी नव्हते. दासबोधासारखा ग्रंथ एकाग्र चित्ताने वाचायला ती जागा फारच योग्य होती. मामांनी खिडकीजवळच्या एका कोपऱ्यात चटई पसरली अन् नाकावर चष्मा ठेवून ग्रंथ उघडला आणि ते दशक बारामधली दहावा समास नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मोठ्याने वाचू लागले. या समासात समर्थानी उत्तम पुरूषांची लक्षणे सांगितली आहेत. मामांनी या समासातील तीन-चार ओव्या वाचल्या असतील-नसतील तेवढ्यात दोन काळे-सावळे पुरूष त्या ठिकाणी अचानक आले व मामांच्या शेजारीच मांडी ठोकून बसले. ते दोघेही वर्णाने काळेसावळे होते. त्यापेकी एक जण ऊंच आणि धिप्पाड होता. त्या दोघांच्या कपाळावर गंध दिसत होते आणि डोकीवर मुंडासे होते. मामांनी क्षणभर त्यांच्याकडे पाहिले आणि हे गोखल्यांच्याच कुणी ओळखीचे असतील असे वाटून त्यांच्याबद्दल फारसा विचार न करता आपले पुढले वाचन सुरू ठेवले. ते दोघेही त्यांच्या पोशाखावरून व चेहऱ्यावरून खेडवळ आणि निरक्षर वाटत होते, तरी पण मामांची प्रत्येक ओवी ते अतिशय लक्षपूर्वक ऐकत होते. मामांना नाही म्हटले तरी त्या गोष्टींचे मनातून थोडे आश्चर्य व कुतूहल वाटलेच. परंतु त्याबद्दल विचार करण्यात विशेष वेळ न घालविता ते वाचीतच राहिले. दंभदर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन । हे अज्ञानाचे लक्षण । भगवद्‌गीतेत बोलिले ।। जो उत्तम गुणे शोभला । तो चि पुरूष महा भला । कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ।। क्रियेवीण शब्दज्ञान । ते चि श्वानाचे वमन । भले तेथे अवलोकन । कदापि न करिती ।। दशक बारा, समास दहामधील ही तिसावी ओवी वाचून संपताच त्या दोघा खेडवळांपेकी जो विशेष धिप्पाड होता त्याने एकाएकी मामांना थांबवून म्हटले, `ही ओवी पुन्हा वाचा बघू.' मामांनी लगेच ती ओवी वाचली. क्रियेवीण शब्दज्ञान । ते चि श्वानाचे वमन । भले तेथे अवलोकन । कदापि न करिती ।। मामांची ओवी वाचून होताच त्या धिप्पाड पुरूषाने मामांना म्हटलं,`या ओवीचा अर्थ सांगू शकाल का तुम्ही ? विशेषतः समर्थानी नुसत्या शाब्दिक ज्ञानाला श्वानाच्या वमनाचीच उपमा का दिली हे मला आपणाकडून हवंय. समर्थानी अन्य कुणा प्राण्याचे वमन,असे का म्हटले नाही ? माझ्या एवढ्याच शंकेचे उत्तर द्या !' त्या अपरिचित खेडवळाकडून अशा काही जटिल प्रश्नाची मामांनी मुळीच अपेक्षा केली नव्हती. त्यामुळे ते क्षणभर चमकले व त्या खेडवळाकडे आश्चर्याने पाहू लागले. त्या वेळी त्या खेडवळाचा चेहरा त्यांना मोठाच तेजस्वी वाटला व हा मनुष्य दिसायला साधा दिसत असला तरी मोठा ज्ञानी असला पाहिजे असे त्यांच्या मनात आले. परंतु त्याच्या प्रश्नाचे काय ? मामांनी ती विशिष्ट ओवी मनातल्या मनात पुन्हा पुन्हा वाचली आणि थोडा वेळ तिच्यावर विचार केला, परंतु त्यांना त्या खेडुताच्या प्रश्नाचे नेमके उत्तर गवसले नाही. त्यामुळे ते त्याला म्हणाले, `मी रोज दासबोध वाचीत असलो तरी त्या ग्रंथाचा मी खास असा अभ्यास केलेला नाही. त्यामुळे आपल्याला पटेल अशा शब्दांत मी त्या ओवीच्या अर्थाची फोड करू शकणार नाही.'

ते ऐकून तो धिप्पाड पुरूष किचिंत हसला. मामांची स्पष्टोक्ती व निरागस भाबडा स्वभाव कदाचित त्याला आवडला असावा. त्यामुळेच त्याच्या हास्यात विलक्षण गोडवा होता. नंतर तो म्हणाला,`या ओवीचा अर्थ मी सांगतो तुम्हाला.' त्याचे हे वाक्य ऐकताच मामांचे आश्चर्य आता मात्र शिगेला पोचले. हा खेडवळ गृहस्थ आणि ओवीचा अर्थ सांगणार ? मामा आश्चर्याने टकमक त्याच्याकडे पाहतच राहिले. एवढ्यात त्याने खरोखरच त्या ओवीचा अर्थ सांगायला सुरूवात केली. तो म्हणाला, `समर्थाच्या `दासबोधा' तील अक्षरन् अक्षर विचारपूर्वक लिहि- ण्यात आलेले आहे. त्यामुळेच त्यातला एक शब्ददेखील इकडचा तिकडे बदलता येणार नाही. समर्थाचा क्रियेवर भर आहे. नुसती शाब्दिक बडबड करणारे खूप असतात- परंतु त्यांचा कुणालाच उपयोग होत नाही. नुसती बडबड करण्यापेक्षा तसे आचरणात आणणे याला महत्त्व आहे. क्रिया न करता नुसती बडबड करणे हे कुत्र्याच्या वमनाप्रमाणे-ओकारीप्रमाणे- तुच्छ किंवा निंद्य आहे. आता येथे समर्थानी कुत्र्याच्याच ओकारीचे उदाहरण  का दिले असा प्रश्न तुम्हाला विचारला. त्याचे उत्तर असे की, कुत्रा हा एकुलता एकच प्राणी आहे की जो स्वतःचे ओकलेले पुन्हा खातो ! बडबडणारा माणूस तेच ते पुन्हा बडबडत असतो. करीत काहीच नाही. कुत्रादेखील ओकलेले तेच पुन्हा खातो. श्वानाचे वमन हे जितके निंद्य, तिरस्करणीय तितकेच क्रियेवीण शब्दरचना निंद्य होय, असे समर्थाना सुचवायचे आहे.' त्या खेडवळाने त्या ओवीचा अर्थ मामांना सांगितला. तो ऐकून मामा तर चकितच झाले. कारण त्यांच्या एकंदर वेषावरून त्याचा दासबोधाचा एवढा व्यासग असेल असे मुळीसुद्धा वाटत नव्हते. नंतर मामांनी त्याला विचारले, `आपले नेहमीचे राहण्याचे ठिकाण कोणते ?' `आम्ही तेलंगणात असतो.' तो उत्तरला. `आपला उद्योग-व्यवसाय ?' `आमचा दुधाचा व्यवसाय आहे. गवळी आम्ही.' आणखी थोडे इकडचे-तिकडचे बोलणे झाल्यावर मामांनी दासबोध होता तसा रेशमी कापडात गुंडाळला. डोळे मिटून समर्थाच्या मूर्तीला व ग्रंथराज दासबोधाला विनम्र भावाने वंदन केले आणि ते जिना उतरून खाली येण्यास निघाले. ते दोघे खेडवळही त्यांच्या पाठोपाठ येऊ लागले. आता खरे आश्चर्य यापुढचे आहे. जिन्याच्या पंधरा-वीस पायऱ्या उतरून मामा अखेरच्या पायरीशी आले व त्यांनी सहज मागे वळून पाहिले, तो काय चमत्कार ! जिन्यात कुणीच नव्हते. मामा तसेच जिना चढून तरातरा वर गेले- परंतु ते दोघे वरही नव्हते ! ते कुठेच नव्हते ! खालच्या मजल्यावर येण्यासाठी त्या एकुलत्या एका जिन्याशिवाय दुसरी वाटच नव्हती. मग मामांच्या पाठोपाठ येणारे ते दोघेजण गेले कुठे ? मामा पुरते चक्रावून गेले ! त्यांनी तरातरा खाली येऊन गोखल्यांना त्यांच्याविषयी विचारलं. गोखले म्हणाले, `मी मघापासून इथे जिन्याशीच खुर्ची टाकून बसलो आहे. इथून कुणीदेखील वर गेलेलं नाही ...!!'  `काय म्हणता ? अगदी खरं सांगता ?' `अगदी गळ्याशपथ !' `मग ते...ते दोघे ...?' `कोण ते ?' गोखल्यांनी भिवया विस्फारीत विचारलं. मग

मामांनी सगळीच हकीकत त्यांना एका दमात सांगून टाकली. ती ऐकून मामांना वंदन करीत गोखले इतकंच म्हणाले,`साक्षात् विठ््ठल रखु- माईच तुम्हाला भेटून गेले...भाग्यवान आहात !' महाभारतकालीन अश्वत्थामा अजूनही जिवंत आहे ! बऱ्हाणपूरजवळच्या जंगलात कदाचित त्याची-तुमची आजही भेट होऊ शकेल ! 4 अश्वत्थामा चिरंजीव आहे का ? अश्वत्थामा, बली, व्यास हनुमान, बिभीषण, कृप आणि परशुराम या सात जणांना आपण चिंरजीव समजतो. याबाबत पुढील श्लोक प्रसिद्ध आहे. अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः । कृपः परशुरामश्च स्पप्तेते चिरजीविनः ।। वेगवेगळ्या कारणांमुळे या सातजणांना चिरंजीव पदाची प्राप्ती झाली. यांपेकी अश्वत्थाम्यासंबंधी महाभारतात पुढील हकीगत वाचावयास मिळते- कौरव-पांडवाचे शस्त्रगुरू जे द्रोणाचार्य यांचा अश्वत्थामा हा एकुलता एक मुलगा. त्याचा ज्या वेळी जन्म झाला त्या वेळी तो घोड्यासारखा आवाज काढून रडू लागला. म्हणून त्याच्या वडिलांनी त्याचे नाव `अश्वत्थामा' असे ठेवले. या अश्वत्थाम्याचा जन्म रूद्राच्या(शंकराच्या) नवसाने झालेला होता. त्यामुळेच तो स्वभावाने फार तापट व तिखट होता. आपल्या वडिलांकडून त्याने शस्त्रविद्येचे पूर्ण शिक्षण घेतले व त्यात तो चांगलाच पारंगतही झाला. भारतीय युद्धात भीमाने आपल्या गदेचा तडाखा मारून दुर्योधनाला घायाळ केले. दुर्योधन मरणोन्मुख होऊन पडला. त्या वेळी त्याने दूताकरवी अश्वत्थात्मायाला बोलावणे पाठविले. अश्वत्थामा दुर्योधनाच्या भेटीस गेला.  त्या वेळी दुर्योधनाने त्याला सेनापतीपद बहाल केले व पांडवांविरूद्ध शर्थीने लढण्यास सांगितले. अश्वत्थाम्याने त्या पदाचा स्वीकार केला व तो आपल्या छावणीत परत आला. त्या रात्री सततच्या विचारचक्रामुळे अश्वत्थाम्याला क्षणभरही झोप लागली नाही. पांडवांचा निःपात कसा करता येईल, हाच एक विचार त्याच्या डोक्यात सतत घोंघावत होता. शेवटी त्याला एक भयानक उपाय सुचला. तो उपाय अत्यंत क्रूर होता. त्याकाळच्या युद्धशास्त्राच्या नीतिनियमांना पूर्ण- पणे सोडून होता. परंतु त्याने तो अंमलात आणण्याचे ठरविले व त्याप्रमाणे रात्री सारा पांडवसेना झोपी गेल्यानंतर तो हळूच त्यांच्या शिबिरात शिरला व त्याने गाढ झोपी गेलेल्या अनेक सेनिकांना तलवारीने ठार मारले. ही भयानक वार्ता ज्या वेळी भीमाला समजली त्या वेळी त्याच्या तळ- पायाची आग मस्तकात गेली व तो या गोष्टीचा सूड घेण्यासाठी त्वेषाने बाहेर पडला. परंतु अश्वत्थामा हा भीमापेक्षाही अस्त्रविद्येत अधिक श्रेष्ठ असल्याने भीमाचा त्याच्यापुढे टिकाव लागणार नाही, ही गोष्ट श्रीकृष्णाने ओळखली व तो अर्जुन व धर्मराज यांना रथात बसवून त्याच्या मदतीस धावला. त्या वेळी भागीरथीच्या तीरावर अश्वत्थामा मळकट वस्त्रे नेसून ऋषींच्या समवेत बसलेला होता. भीमसेनाने त्यास आव्हान करून धनुष्य सज्ज केले. तेवढ्यात श्रीकृष्ण अर्जुन व धर्मासह तेथे येऊन पोचला. त्यांना पाहून द्रोणपुत्र अश्वत्थाम्याने मूठभर गवताच्या काड्या घेऊन त्या ब्रम्ह- शिरस् मंत्राने अभिमंत्रित केल्या व

`अपाण्डवाय' (पांडवांच्या संहारार्थ) असे म्हणून वर फेकल्या. अश्वत्थाम्याच्या मनातील हा बेत श्रीकृष्णाने अगोदरच ओळखला होता. त्याने गवताच्या काड्या वर फेकलेल्या पाह- ताच श्रीकृष्णाने अर्जुनास खूण केली. त्याबरोबर अर्जुनाने शंकराचे स्मरण करून, `या अस्त्राचे शमन होवो' असे म्हणत अश्वत्थाम्याच्या अस्त्रावर ब्रम्हशिर नावाचे दुसरे अस्त्र सोडले. त्या दोघा महावीरांनी सोडलेल्या या भयानक अस्त्रांच्या योगे सर्वत्र आगीचा डोंब उसळला. तेवढ्यात भगवान व्यास व महर्षी नारद त्या ठिकाणी आले व अशी भयानक अस्त्रे सोडून सार्‍या जगात हाहाःकार उडविल्याबद्दल त्यांनी त्या  दोघांनाही दोष दिला. त्या वेळी अर्जुन म्हणाला, `या अश्वत्थाम्याने जे संहारास्त्र सोडले त्याचा केवळ प्रतिकार करण्यासाठीच मला दुसरे अस्त्र सोडावे लागले. जगाला पीडा देण्याचा माझा त्यामागे हेतू नव्हता.' असे म्हणून अर्जुनाने आपले अस्त्र परत घेतले. परंतु अश्वत्थाम्याचे तपसामर्थ्य अर्जुनापेक्षा कमी असल्याने त्याला स्वतः सोडलेले अस्त्र परत घेता येईना. त्यामुळे भयभीत झालेला अश्वत्थामा व्यास व नारदांना म्हणाला,` भीमाची भीती वाटूनच मी ते अस्त्र सोडण्यास प्रवृत्त झालो. परंतु आता ते परत घेणे मला जमत नाही. आता मी ते पांडवांवरून काढून पांडवांच्या स्त्रियांच्या पोटात जे गर्भ असतील त्यांच्या- वर सोडतो.' ही गोष्ट व्यास व श्रीकृष्ण या दोघांनीही मान्य केली. कारण दुसरा इलाजच नव्हता. त्याप्रमाणे ते अस्त्र पांडवांच्या पाठलाग सोडून त्यांच्या स्त्रियांच्या दिशेने निघाले. त्या वेळी श्रीकृष्ण चिडून अश्वत्थाम्याला म्हणाले, `आजवर तू अनंत पापे केली आहेस. त्यात या बालहत्येची नवी भर पडत आहे. या पापाचे प्रायश्चित तुला असे मिळेल, की तू अनेक व्याधींनी जर्जर होऊन हजारो वर्षे निर्मनुष्य अशा जंगलात व डोंगरात राहशील.' व्यासांनीही त्याला म्हटले की, `तू ब्राम्हण असूनही अनेक नीच कर्मे केलीस. त्याचे प्रायश्चित श्रीकृष्ण म्हणतात त्याप्रमाणे तुला निःसंशय मिळेल. आता आपल्या मस्तकातला मणी मुकाट्याने धर्मराजाला देऊन तू वनात निघून जा.' अश्वत्थाम्याने त्याप्रमाणे आपल्या मस्तकावरचा देदिप्यमान मणी धर्म- राजाच्या स्वाधीन केला व श्रीकृष्ण परमात्म्याचा शाप भोगण्यासाठी तो निबीड अशा वनात निघून गेला. या गोष्टीला आज हजारो वर्षे उलटली. विद्वानांनी महाभारताचा काळ इ.स. पू. 1931 अशा निश्चित केला आहे. म्हणजे, वरील प्रसंग घडून आज साधारण 3900 वर्षे झाली. परंतु अश्वत्थामा ज्याअर्थी अजूनही कुणाकुणाला दर्शन देतो, त्याअर्थी तो शापमुक्त झालेला नाही. शापमुक्त  होण्याची वाट पाहत, अनेक शारीरिक व्याधींनी जर्जर झालेला अश्वत्थामा निर्मनुष्य रानावनातून एकाकी फिरतो आहे. तो केव्हा मुक्त होणार हे एका परमेश्वरालाच ठाऊक ! अश्वत्थाम्याच्या शापाची ही हकीगत महाभारतात दिली म्हणून ती खरी समजावयास हरकत नाही. दुसरे असे की, अश्वत्थामा कुणाकुणाला अजूनही भेटतो. तशा हकीकती वृत्तपत्रातून केव्हा केव्हा प्रसिद्धही होतात ! आमचे

वडील अश्वत्थाम्याच्या संदर्भात पुढील एक विलक्षण कथा नेहमी सांगायचे- `अश्वत्थामा' हा चिंरजीव असून तो बऱ्हाणपूरजवळच्या जंगलात राहतो व भिक्षेसाठी गावात येतो, ही गोष्ट रेल्वेत स्टेशनमास्तरच्या हुद्द्या- वर काम करणाऱ्या श्री.जोशी नावाच्या एका गृहस्थांना ठाऊक होती. श्री. जोशी हे मोठे चिकित्सक गृहस्थ होते. त्यांचे घर बऱ्हाणपुरातच होते. अश्वत्थाम्याबद्दलची ही ऐकीव कथा कितपत सत्य आहे याची शहानिशा करण्याची त्यांनी ठरविले. एखादी गोष्ट एकदा मनात आल्यानंतर ती प्राप्त होईपर्यंत तिचा पिच्छा सोडायचा नाही, अशी त्यांची धडपडी वृत्ती होती. त्यामुळे त्या अश्वत्थाम्याला शोधून काढायचे असा त्यांनी चंग बांधला व त्या दृष्टीने त्यांनी गावातील वृद्ध लोकांना भेटून अश्वत्थाम्याबद्दल इत्यंभूत माहिती मिळवावयास सुरूवात केली. त्या वृद्धांच्या तोंडून त्यांना असे समजले की, हा अश्वत्थामा एका विशिष्ट वेषात भिक्षा मागण्यासाठी गावात येतो. त्याला मुख्यतः तेल लागते. कारण त्याच्या डोक्यावर कधीही बरी न होणारी जखम आहे व हे तेल त्या जखमेत भरण्यासाठीच त्याला लागते. ही जखम कुणाला दिसू नये यासाठी तो डोक्यावला चिंधी गुंडाळतो. तेलाबरोबरच तो थोडे पीठही मागून घेतो. जोशी मास्तरांनी अशा प्रकारे अश्वत्थाम्याबद्दलची सर्व बारीकसारीक माहिती जमा केली व तिच्या आधारे त्यांनी अश्वत्थाम्याला शोधून काढ- ण्याचे ठरविले. त्यासाठी ते विशिष्ट वेळी डोळ्यात तेल घालून बसू लागले. परंतु बरेच दिवस लोटले तरी अश्वत्थाम्याच्या वर्णनाशी जुळेल असा एकही भिक्षेकरी त्यांच्या आढळात आला नाही.' त्यामुळे आपण अश्वत्थाम्याविषयी ऐकलेल्या सर्व कथा या केवळ दंत- कथाच असाव्यात असे त्यांना वाटले व त्यांनी त्याला शोधून काढण्याचा नाद सोडून देण्याचे ठरविले. परंतु पुढे चार-पाच दिवसांतच त्यांना हवा होता अगदी तशाच वर्ण- नाचा एक भिक्षेकरी त्यांच्या दारात आला. जोशी मास्तरांनी त्याच्या शरीरावरील सर्व खाणाखुणा बारकाईने तपासल्या व तो भिक्षेकरी म्हणजे अश्वत्थामाच असला पाहिजे अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगू लागली. त्या भिक्षेकऱ्याच्या डोक्याला खरोखरच जखम झालेली दिसत होती व त्याने त्यासाठी डोक्यावर चिंधीही गुंडाळलेली होती. दुसरे म्हणजे, तो तेल व पिठाचीच भिक्षा मागत होता ! जोशी मास्तरांचा आनंद गगनात मावेना ! त्यांनी त्या भिक्षेकऱ्याला तेल घातले व पायात चपला घालून ते त्याच्या पाठलागावरच निघाले. जोशी मास्तर आपला पाठलाग करीत आहेत ही गोष्ट त्या भिक्षेकऱ्याच्या फार उशिरा लक्षात आली. कारण जोशी मास्तर त्याला समजणार नाही अशा बेतानेच त्याच्या पाठोपाठ चालले होते. पण गावची हद्द संपून जेव्हा भिक्षेकऱ्याने निबीड जंगलात प्रवेश केला तेव्हा त्याला जोशी मास्तरांची चाहूल लागली. कारण त्या निर्जन जागेत फार काळ लपूनछपून चालणे मास्तरांना शक्य नव्हते. याचे कारण, तो भिक्षेकरी त्या अरण्यात कुठेतरी बेपत्ता होण्याचा संभव होता. म्हणून त्याच्या पाठोपाठ पूर्वीप्रमाणे खूप अंतर ठेवून चालणे योग्य नव्हते. त्या

भिक्षेकऱ्याला जोशी मास्तरांची चाहूल तर लागली होती. त्यामुळे तो अधूनमधून मागे वळून त्यांच्याकडे पाहत होता. त्याने आपल्याला पाहिले ही गोष्ट जोशी मास्तरांनीही ओळखली होती, परंतु ते जणू आपण त्या गावचेच नाही अशा थाटात त्याच्या पाठोपाठ चालत होते. अखेर त्या भिक्षेकऱ्याला जोशी मास्तरांचा संशय आलाच. हा गृहस्थ केवळ आपले गूढ उकलण्यासाठीच आपल्या पाठोपाठ येत आहे हे त्याला समजून चुकले व तो एकाकी थांबला.

त्याने जोशी मास्तरांकडे किचिंत रागाने पाहिले. परंतु जोशी मास्तरांनी तिकडे लक्षच दिले नाही. तेही काही निमित्त करून एका झाडाजवळ उभे राहिले. तो भिक्षेकरी पुढे निघाला. तसे जोशी मास्तरही निघाले. असा प्रकार दोन-तीन वेळा झाला आणि मग तो भिक्षेकरी खरोखरीच रागावला. त्याने शुद्ध मराठीत विचारले,`आपण माझा पाठलाग कशासाठी चालवलाय ?' त्यावर जोशी मास्तर म्हणाले, `आता स्पष्टच बोलू का ?' `हूं !' तो भिक्षेकरी आपले टपोरे डोळे त्यांच्यावर रोखीत म्हणाला, त्या डोळ्यांतून जणू अग्निवर्षाव होत आहे, असे जोशी मास्तरांना वाटले. `माफ करा-' जोशी मास्तर विनयाने म्हणाले, `पण आपण कोण आहात हे मला कळेल का ?' `मी कुणीही असेन. तुम्हाला काय करायचे ?' `असे चिडू नका. मला असे वाटते की.. की आपण भिक्षेकरी नसून महा- भारत काळातील अश्वत्थामा आहात...! ' जोशी मास्तर धिटाईने बोलून गेले. ते ऐकल्यावर मात्र तो भिक्षेकरी चपापला. थोडा नरमलाही. अन् थोडा वेळ थांबून म्हणाला,`आपली अटकळ बरोबर आहे...मी..अश्व- त्थामाच आहे..!' `काय ?आपण खरेच अश्वत्थामा आहात ?' `होय. मीच अश्वत्थामा' `आपल्या दर्शनाने आनंद वाटला.' `मग आता तरी माझा पाठलाग सोडा.' `ते मात्र जमणार नाही हं !' `हे पहा, तुम्हाला जे हवे ते मी देईन. परंतु कृपा करून माझा पाठलाग बंद करा...' `मला हवे ते आपण द्याल ? ' जोशी मास्तरांनी खात्री करून घेण्यासाठी विचारले. `होय. देईन, नक्की देईन !' `मग...मग...' `बोला. काय हवे तुम्हाला ?' अश्वत्थामाने विचारले.`लवकर सांगा.' `माझी एकच इच्छा आहे- फक्त एकच ' `कोणती ?' `मला धन,जडजवाहीर- काही नको.' `मग ?' `पुरी कराल माझी इच्छा ?' `होय, करीन, नक्की करीन.' `मग ऐका तर...' अश्वत्थामा कान देऊन लक्षपूर्वक ऐकू लागला. `थोडं चमत्कारिक नि जगावेगळं मागणं आहे माझं...' `ते कसंही असो- पण लवकर सांगा.' `मला महाभारतकाळात घडलेलं भारतीय युद्ध याचि देही याचि डोळा बघायची इच्छा आहे...' `तुमचं मागणं विलक्षण आहे.' `ते मी आधीच सांगितलं होतं.' अश्वत्थामा विचारात पडला. बराच वेळ गप्प राहिला. `का ? आपण काहीही मागा म्हणाला होतात ना ?' जोशी मास्तरांनी त्याला बोलतं करण्यासाठी विचारलं. `तुमचं मागणं विलक्षण आहे एवढचं म्हणालो मी. ते मला पुरं करता येणार नाही असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नव्हता...पण ' `मग हा `पण ' कशासाठी ?' `एक गोष्ट लक्षात ठेवा. महाभारत कालात घडलेलं प्रसिद्ध भारतीय युद्ध मी आपणाला जरूर दाखवीन. परंतु अर्जुन ज्या वेळी रथात बसून युद्धासाठी येईल व युद्धाला सुरूवात करण्यापूर्वी आपल्या हातातला शंख जोराने फुंकील, त्या वेळी पृथ्वीचा थरकाप उडवून टाकणारा तो आवाज तुम्हाला सहन व्हायचा नाही. तुम्ही बेशुद्ध पडाल तो ऐकून.' मास्तर किचिंत विचारात पडले. परंतु लगेच म्हणाले, `मी बेशुद्ध पडलो तरी चालेल. परंतु ते युद्ध प्रत्यक्षात पाहायचंच आहे मला..मग माझे काय वाटेल ते होवो ...!' `पाहा. पुन्हा एकदा नीट विचार करा.' `माझा विचार आता बदलायचा

नाही..' `ठी आहे,' असं म्हणून अश्वत्थाम्याने काही मंत्र म्हणून मास्तरांच्या भोवती एक वर्तुळ काढलं नि तो म्हणाला,` या वर्तुळाच्या बाहेर पाऊल टाकायचं नाही टाकलंत तर फुकट मराल !' `ठीक आहे. नाही टाकणार.' त्यानंतर अश्वत्थाम्याने आणखी एक मंत्र म्हटला. त्याबरोबर मास्तरांच्या डोळ्यांसमोर सिनेमाप्रमाणे भारतीय युद्धाचा देखावा दिसावयास सुरूवात झाली. प्रथम कौरव-पांडवांची सेन्ये एकमेकांच्या दिशेने येताना दिसली. त्यात हजारो रथ, घोडे व हत्ती होते. त्यांची धाव अतिशय वेगात असल्याने सारा आसमंत धुळीने भरून गेला होता. परंतु एखादा प्रखर दिव्याचा झोक पडावा त्याप्रमाणे कुठून तरी त्या दृश्यावर लख्ख प्रकाश पडला व मास्तर- रांना हुबेहूब सिनेमात पाहिल्याप्रमाणेच पुढची दृश्ये दिसू लागली. तेवढ्यात एका बाजूने महाधनुर्धर अर्जुनाचा रथ येताना दिसला. मास्तर डोळ्याची पापणीदेखील न हलविता तो सारा प्रकार विलक्षण कुतूहलाने पाहत होते. अर्जुनाच्या रथाचे सारथ्य भगवान श्रीकृष्ण करीत होते व त्याच्या रथाच्या ध्वजाचे रक्षण महावीर हनुमान करीत होता. तेवढ्यात...दोन्ही सेन्ये समोरासमोर येऊन थडकली व आता युद्धाला सुरूवात होणार तोच...अर्जुनाने रथात उभे राहून आपल्या हातातील खंश फुकावयास सुरूवात केली. तो आवाज प्रलयकाळच्या मेघगर्जनेप्रमाणे महा- भयंकर होता. आणि...तो आवाज कानी पडताच अश्वत्थाम्याने सांगितल्या- प्रमाणे जोशी मास्तरांची शुद्ध खरोखरच हरपली. ते जागच्या जागी जमिनी- वर कोसळले ...! त्यानंतर काय घडले ते जोशी मास्तरांना ठाऊक नाही. ते शुद्धीवर आले तेव्हा एका दवाखान्यात होते व त्यांच्या भोवती मित्रपरिवार व  नातेवाईक यांचा जागता पहारा होता !' जोशी मास्तरांची ही हकीगत आमच्या वडिलांच्या तोंडून आम्ही अनेकदा ऐकली आहे. यातील अश्वत्थामा अजूनही भेटतो हे सत्य नाकारता येणार नाही. कारण अश्वत्थामा भेटल्याचा उल्लेख आणखीही काही ठिकाणी सापडतो. श्रीवासुदेवानन्द सरस्वती ऊर्फ श्रीटेंबेस्वामी महाराज यांच्या चरित्रात त्यांना अश्वत्थामा भेटल्याबद्दलचा पुढील उल्लेख आहे... `शके 1834 मध्ये इंदूर संस्थानातील चिखलदरा येथील चातुर्मास संपवून महाराज कातरखेडामधील शूलपाणीश्वरास वंदन करून अरण्यातून गरूडेश्वराकडे निघाले. शूलपाणीश्वराचे जंगलात अश्वत्थामा वास करतो. हे अरण्य अतिशय घोर असून तेथे चालण्यासाठी साधी पाऊलवाटही नाही. तेथून जात असता एका भिल्लाने महाराजांना `आपणास कोठे जावयाचे आहे ?' असा प्रश्न केला. महाराज म्हणाले, `मी गरूडेश्वरास निघालो आहे.' `मग आपण माझ्या पाठोपाठ या.' तो भिल्ल म्हणाला व पुढे चालू लागला. महाराज त्याच्या पाठोपाठ निघाले. गरूडेश्वर आल्यावर तो भिल्ल म्हणाला, `ते समोर जे मंदिर दिसते आहे तेथे चला.' असे सांगून ते पुन्हा पुढे निघाला. इतक्यात महाराजांना काही संशय येऊन त्यांनी त्यास म्हटले,`तू कोण आहेस हे खरे खरे सांग बरं.' त्यावर तो भिल्लवेषधारी मनुष्य म्हणाला, `मी अश्वत्थामा

असून या जंगलात राहतो.' एवढे सांगून तो तसाच पुढे निघाला व दिसेनासा झाला.' काही दिवसांपूर्वी मुंबईच्या `श्री' साप्ताहिकात नाशिकच्या श्री. बोटेकर नावाच्या एका गृहस्थांचा अश्वत्थाम्याच्या भेटीसंबंधीचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. श्री बोटेकर हे अनेक मंडळीसह नर्मदा प्रदक्षिणेला निघाले होते. वाटेत नर्मदेच्या काठी त्यांना बारा-चौदा फूट उंचीचा अश्वत्थामा भेटला. मात्र त्याला मराठी भाषा येत नव्हती व त्याची भाषा बोटेकरांना कळत नव्हती. या अश्वत्थाम्याने त्या मंडळीबरोबर भोजनही केले व त्यानंतर आता स्वप्नात येऊन तो बोटेकरांना महाभारतातील कथा ऐकवतो.  व हल्ली प्रचारात असलेल्या महाभारत ग्रंथात काही चुका असल्याचेही सांगतो ! श्रीटेंबेस्वामी किंवा जोशी मास्तर यांना भेटलाला अश्त्थामा व श्री. बोटेकरांना भेटलेला अश्वत्थामा यांमध्ये खूपच अंतर दिसते. कारण एक तर पहिल्या दोघांना भेटलेला अश्वत्थाम्याने त्यांच्याशी शुद्ध मराठीत भाषण केले. तसेच तो बारा-चौदा फूट उंचही नव्हता. तसा तो असता तर त्याला ओळखण्यासाठी जोशी मास्तरांना इतके प्रयास पडण्याचे काहीच कारण नव्हते. बारा-चौदा फूट उंचीचा अश्वत्थामा कोणत्याही वेषात आला तरी हजारो लोकांतून सहज बाजूला काढता आला असता. त्यासाठी आठ-आठ दिवस दबा धरून बसण्याची काहीच जरूरी नव्हती. याचाच अर्थ, जोशी मास्तरांना भेटलेला अश्वत्थामा सर्वसाधारण माणसाइतकाच उंच असला पाहिजे. शिवाय, बारा-चौदा फूट उंचीचा अश्वत्थामा पाहून बोटेकर किंवा त्यांच्या बरोबरीच्या मंडळीपेकी कुणालाच भीती कशी वाटली नाही, ही दुसरी शंका ! नुसती कल्पना करा की, तुमच्यासमोर बारा-चौदा फूट उंचीचा माणूस एकाएकी येऊन उभा राहिला तर तुमची काय अवस्था होईल ? तुम्ही बहुतेक घाबरून बेशुद्ध पडण्याची शक्यता आहे. परंतु बोटेकर किंवा त्यांच्या बरोबरीच्या मंडळापेकी एकहीजण अशी प्रकारे बेशुद्ध पडलेला नाही. तिसरा एक प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो तो असा की, अश्व- त्थाम्याची भाषा जर बोटेकरांना कळण्यासारखी नव्हती तर स्वप्नात येऊन तो जे महाभारत त्यांना नव्याने सांगतो आहे ते कुठल्या भाषेत ? व ती भाषा बोटेकरांना कशी काय समजते ? हे प्रश्न खूप विचार करूनही मला सुटलेले नाहीत. वाचकांपेकी कुणी याबाबत मला पटण्यासारखा खुलासा केल्यास मी फार आभारी होईन ! असो. सांगायचा मुद्दा इतकाच की, अश्वत्थामा अजूनही भेटतो ही गोष्ट मला तरी कल्पित वाटत नाही. आणि श्रीकृष्णाच्या शापाप्रमाणे तो अजूनही मुक्तीच्या क्षणाची वाट पाहत खरोरीच फिरत असेल व त्याला आपली भाषा समजत असेल तर त्याची प्रत्यक्ष भेट घेण्याचे धाडस एखाद्या इतिहास-  संशोधकाने का करू नये ? कारण त्याच्या सुदेवाने त्याला अश्वत्थामा भेटलाच तर त्याच्या तोंडून केवळ महाभारताकालीनच नव्हे, तर त्यानंतरच्या काळातीलही कितीतरी गोष्टी ऐकायला मिळतील व नवी माहिती प्रकाशात येईल. या अश्वत्थाम्याचा प्रत्यक्ष फोटो घेऊन त्याचे भाषणदेखील `टेप'- वर रेकॉर्ड करता येईल. मोठमोठी

ऊंच शिखरे सर करण्याचे धाडस ज्याप्रमाणे काही धाडसी लोक करतात त्याचप्रमाणे सूलपाणीश्वराच्या घनदाट जंगलात केवळ अश्व- त्थाम्याला भेटण्यासाठी महिना दोन महिने मुक्काम करण्याचे धाडस कुणीच का करू नये ? माझी ही कल्पना कुणाला हास्यास्पद वाटले, परंतु सत्याचा शोध घेण्यासाठी अशा काही धाडसी कल्पना प्रत्यक्षात उतरविणे हा एकच मार्ग आहे, असे मला तरी वाटते.  भारताचे भूषण असलेल्या नगाधिराज हिमा- लयावर कित्येक सिद्ध पुरूष तपश्चर्या करीत आहेत.त्यांतले काही तर महाभारतकाला- पासून तेथे घोर तप करीत आहेत. त्यांच्या प्रत्यक्ष भेटीची ही लोकविलक्षण हकीकत ! 6. हिमालयावर सिद्ध पुरूष आहेत का ? नगाधिराज हिमालय हे आम्हा भारतीयांचं भूषण आहे. ही हिमालयाची भूमी पुरातन कालापासून सिद्धांची तपोभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. काही वर्षा- पूर्वी माझ्या माहितीचे एक साधक हिमालयाच्या यात्रेस गेले होते. तेथून परत आल्यावर ते मला म्हणाले, `चीनने हिमालयाच्या बाजूने भारतावर कितीही हल्ले चढविले तरी ते यशस्वी होणार नाहीत, कारण हिमालयावर साक्षात भगवान शंकरांचा वास असून त्या तपोभूमीत अनेक सिद्ध महापुरूष तपश्चर्या करीत आहेत, असा तेथील रहिवाशांचा ठाम विश्वास आहे !' हिमालयावर साक्षात भगवान शंकर वास करीत आहेत ही कल्पना पुराण कालापासून चालत आलेली आहे. परंतु ती एक पुराणकथा म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष केले तरी त्या तपोभूमीत अनेक सिद्ध पुरूषांचा वास आहे ही गोष्ट दुर्लक्षिता येणार नाही. कारण या सिद्ध पुरूषांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे भाग्य काही भाग्यवंतांना लाभले आहे ! या संदर्भात एका महान योगीराजांनी सांगितलेली हकीकत लक्षात ठेवण्यासारखी आहे. या योगीराजाचं नाव आहे श्री. ज्योतिःप्रकाशाश्रमजी. त्यांनी ही आश्चर्यकारक हकीकत प्रथम श्री.दिवाकर शास्त्री यांना सांगि- तली. पुढे श्री. दिवाकर शास्त्री यांच्याकडून ती रामदास शरणदासजी यांना समजली व त्यांनी ती `कल्याण' मासिकाच्या नोव्हेंबर 1962 च्या अंकात खास जिज्ञासू वाचकांसाठी लेखरूपाने प्रसिद्ध केली. ती सारीच हकीकत जितकी विस्मयकारक तितकीच मनोरंजक देखील आहे. योगीराज ज्योति-प्रकाशाश्रमजी हे जातीने ब्राम्हण. बालपणापासूनच त्यांच्या मनात रामदर्शनाची ओढ निर्माण झाली आणि माता-पित्यांच्या निधनानंतर ती ओढ इतकी वाढली, की सर्वसंगपरित्याग करून ते हिमा- लयाच्या कुशीत शिरले. हिमालयावर अनेक सिद्ध महात्मे तपश्चर्या करीत असतात ही गोष्ट त्यांनी अनेकांकडून ऐकली होती. परंतु या ऐकीव माहितीवर त्यांचे समा- धान होऊ शकले नाही. या सिद्ध पुरूषांना प्रत्यक्षच पाहावे अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली आणि त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. प्रथम बद्रिनारायणाचे दर्शन घेऊन त्यांनी हिमालय पर्वत चढण्यास सुरूवात केली. कित्येक दिवस ते मार्गक्रमण करीत होते. वाटेत एके ठिकाणी एका भयंकर वनराजाने दर्शन देऊन त्यांना चांगलेच घाबरून सोडले. परंतु त्या वेळी त्यांनी मनात रामनामाचा

जप सुरू केला आणि आश्चर्य असे, की तो सिंह त्यांच्या डोक्यावरून उडी मारून गुपचूप पुढे निघून गेला ! ही सारी प्रभू रामचंद्रांचीच कृपा असे स्वामीजींना वाटले आणि त्यांनी त्यांच्या दर्शनासाठी त्या निर्मनुष्य ठिकाणी घोर तपश्चर्येस प्रारंभ केला. त्यांनी आपल्याबरोबर हिमालयात सापडणारा एक विशिष्ट कंद घेतला होता. तो कंद खाल्ल्यावर आठवडाभर भूक लागत नसे. आणि विशेष म्हणजे, हा कंद पचावयासही अतिशय हलका होता. त्या ठिकाणी काही औषधी वनस्पतीही उगवलेल्या होत्या. त्या वनस्पतींचे वेशिष्ट्य म्हणजे त्या वनस्पती रात्रीच्या अंधारात प्रकाशत असत आणि त्यांचा प्रकाश त्यांच्या- पासून चांगला चार-पाच फूट अंतरापर्यंत पडत असे ! मात्र, त्यांना स्पर्श करताच तो प्रकाश आपोआपच लुप्त होत असे. अशा प्रकारे कित्येक दिवस त्या निर्जन स्थळी उग्र तपश्चर्या केल्यानंतर स्वामीजींना एक जटाधारी ब्रम्हचारी भेटला. त्याने स्वामीजींकडे पाहत शुद्ध संस्कृतात विचारलं, `कस्त्वम,कुतश्च समायातः' (म्हणजे....तू कोण आणि इकडे कशासाठी आला आहेस ?) परंतु स्वामींजींना संस्कृत बेताचेच येत असल्याने त्यांनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे हिंदी भाषेत दिली. प्रथम आपलं नाव सांगून ते म्हणाले,`या हिमालयावर मोठमोठे सिद्ध पुरूष तपश्चर्या करीत असल्यानं मी अनेकांच्या तोंडून ऐकलं आहे. त्या महापुण्यवान सिद्ध पुरूषांचं दर्शन घडावं, या हेतूनं मी इथे आलो आहे.' त्यावर तो जटाधारी ब्रम्हचारी किंचित हसून म्हणाला,`मित्रा, तू म्हणतोस तसे सिद्ध पुरूष ऋषिकेशपासून पुढे सर्व हिमालय पर्वतावर पसर- लेले आहेत. परंतु सामान्य माणसांना ते कसे दिसतील ?मला सांग, तू गायत्री मंत्राची किती पुरश्चरणे केली आहेस ? किंवा कोणती उपासना करून आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न केले आहेस ? तू जर यापेकी काहीच केलं नसशील तर मुकाट्याने परत फीर.' अशा प्रकारे त्या ब्रम्हचाऱ्याने आमच्या योगीमहाराजांना त्यांच्या विचारां- पासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु योगीमहाराज काही केवळ गंमत म्हणून त्या ठिकाणी आलेले नव्हते. सिद्ध पुरूषांचं दर्शन घेतल्याशिवाय इथून परत फिरायचंच नाही, अशा निर्धारानेच ते तेथे आले होते. ते त्या ब्रम्हचाऱ्याच्या उपदेशाला थोडेच बधणार ? त्यांनी स्पष्ट शब्दात त्या ब्रम्हचाऱ्याला सांगितलं,` महाराज, क्षमा करा. मी आता परत फिरू शकणार नाही. इथे राहूनच राम मंत्राचा जप करीन. मग जशी प्रभूची इच्छा असेल तर घडेल.' योगीराजांचे ते निग्रहाचे बोल ऐकून तो जटाधारी ब्रम्हचारी म्हणाला, `ठीक आहे. जशी तुझी इच्छा !' आणि असे म्हणून त्यांनी योगीराजांना एक कसलीशी बुटी दाखवून म्हटले, `या बुटीचा एक तोळा अर्क काढून तो प्यायला असता सात दिवनसापर्यंत तुला भूक लागणार नाही आणि तुझी शक्तीही कमी होणार नाही. तुझी इच्छा असल्यास तू हिचा उपयोग कर.' त्यानंतर त्याने योगीराजांना एका प्रचंड अशा वटवृक्षाखाली नेऊन म्हटले,`तू या वृक्षाखाली बसून तपश्चर्या कर. हे स्थान तपश्चर्येसाठी योग्य आहे.' तो वटवृक्ष पाहून योगीराज

विस्मयचकित झाले. कारण त्याचा परीघ जवळजवळ एक मेल पसरला होता. त्याची उंचीही फारच प्रचंड होती. त्या  वृक्षाचं दुसरं वेशिष्ट्य असं होतं की, थंडीच्या दिवसांत त्याच्या खालचं वातावरण गरम राहत असे तर उन्हाळ्याच्या दिवसांत ते अतिशय थंड बनत असे. त्या दिवसापासून योगीराजांनी तेथेच बसून आपली तपश्चर्या पुढे सुरू केली. असेच दहा-बारा महिने गेल्यानंतर तो पूर्वीचाच ब्रम्हचारी एक दिवस अचानक तिथे आला आणि योगीराजांकडे पाहून म्हणाला, `मित्रा, आता तपश्चर्या बस झाली ! तू आता देशावर जाऊन अध्यात्मशास्त्राचा अभ्यास कर, नि मग वाटलं तर पुन्हा इकडे ये.' परंतु योगीराज पूर्वीच्याच निग्रही स्वरात म्हणाले, `महाराज ! कृपा करून मला आता परत जायला सांगू नका. मी इथे आलो तो सिद्ध पुरूषांच्या दर्शनाची इच्छा मनात बाळगून ! माझी ती इच्छा पूर्ण झाल्याशिवाय मी मुळीच परत जायचा नाही.' त्यावर ब्रम्हचारी थोडा वेळ विचारात पडला. नंतर तो उठून उभा राहिला आणि त्याने योगीराजांना खूण करून आपल्या पाठोपाठ यायला सांगितलं. योगीराज म्हणतात, `थोडे अंतर चालून गेल्यावर आम्ही एका प्रचंड शिळेजवळ आलो. त्या शिळेवर एक योगी समाधी लावून बसलेला होता. त्यानं पद्मासन घातलेलं होतं. तो इतका उंच होता, की तो माझ्या- समोर बसला असूनसुद्धा माझ्यापेक्षा अधिक उंच दिसत होता ! त्याच्या जटा जमिनीवर लोंबत होत्या. त्याच्या भृकुटीचे केस दाढीसारखे लांब वाढले होते. त्याची नखे सिंहाच्या नखासारखी होती.' त्याच्याकडे बोट करून ब्रम्हचारी म्हणाला, `हेच माझे पूज्य गुरूदेव ! गेली शंभर वर्षे हे समाधी अवस्थेत आहेत. चल, आता तुझी इच्छा पूर्ण झाली ना ? आता मी तुला तुझ्या त्या वटवृक्षाजवळ घेऊन जातो. कारण तुला एकट्याला तो रस्ता सापडणार नाही.' असे म्हणून त्याने मला माझ्या पूर्वीच्या वटवृक्षाजवळ आणून सोडले. आणि मी पुन्हा माझ्या तपश्चर्येला सुरूवात केली.' त्यानंतर थोड्याच दिवसांनी तो ब्रम्हचारी पुन्हा त्या योगीराजांकडे आला व म्हणाला, `आता जप करून तुझे मन पुष्कळच पवित्र झाले आहे. चल, मी तुला आता आणखी काही अद्भुत गोष्टी दाखवितो.' त्याचे ते भाषण ऐकून योगीराजांना फार आंनद झाला आणि ते त्या जटाधारी ब्रम्हचाऱ्याच्या बरोबर निघाले. बराच वेळ चालल्यानंतर ते दोघे एका प्रचंड गुहेपाशी आले. त्या गुहेच्या तोंडाशी एक खूप मोठा वजनदार दगड होता. परंतु त्या जटाधारी ब्रम्ह- चाऱ्यान तो अगदी सहजपणे बाजूला केला व ते दोघे आत गेले. योगीराज म्हणतात- `नंतर आम्ही आठ तास सतत चालत होतो. शेवटी आम्ही त्या गुहेच्या पार टोकाशी आलो. तेथेही एक प्रचंड दगड दाराशी बसविलेला होता. ब्रम्हचारीबुवांनी तो पूर्वीसारखाच अगदी सहजपणे बाजूला केला व आम्ही बाहेर आलो. त्याची ती विलक्षण ताकद पाहून मी तर थक्कच झालो. आता आमच्यासमोर एक प्रचंड मेदान परसलेलं दिसत होतं. त्याला लागूनच एक अतिशय भव्य असा किल्ला होता. या किल्ल्यात कितीतरी महात्मे, सिद्धपुरूष

समाधी लावून बसलेले आम्ही पाहिले. त्यांच्या बाजूला पाण्याचे झरेही झुळूझुळू वाहत होते.' `हे कोणते स्थान आहे ? ' योगीराजांनी कुतूहलाने त्या जटाधारी ब्रम्ह- चाऱ्याला विचारले. `हा अर्जुनानं बांधलेला किल्ला आहे. मुनिश्रेष्ठ व्यासांच्या सांगण्यावरून अर्जुन या ठिकाणी तपश्चर्येसाठी आला होता.' ब्रम्हचारी म्हणाला. नंतर त्या सिद्धांकडे अंगुलीनिर्देश करून तो ब्रम्हचारी पुढे म्हणाला, `हे जे पुरूष तुला दिसताहेत, ते सारे महाभारत कालापासून इथे समाधी लावून बसले आहेत.' त्याने सांगितलेली ती विलक्षण आश्चर्यकारक माहिती ऐकून योगीराज अतिशय थक्क झाले. त्यांनी मोठ्या भक्तिभावाने त्या महापुरूषांना वंदन केले. नंतर त्यांनी त्याच ठिकाणी काही काल राहण्याची इच्छा ब्रम्हचाऱ्याजवळ व्यक्ती केली.  परंतु ब्रम्हचारी म्हणाला,`ते मुळीच शक्य नाही. कारण इथे फक्त सिद्ध पुरूषांना राहण्याचीच परवानगी आहे.' वरील हकीगत अतिशय अद्भूत असल्यामुळे ती कल्पित असावी असे वाटण्याचा संभव आहे. परंतु ती पूर्णपणे सत्य असून ती सांगताना थोडीसुद्धा अतिशयोक्ती कुठेही केलेली नाही. हिमालय पर्वतावर अशा प्रकारच्या सिद्ध महात्म्यांची वस्ती असून त्यांचे दर्शन एखाद्याच भाग्यवंताला होऊ शकते. या सिद्ध पुरूषांजवळ अनेक अद्- भुत वनस्पती असून त्यांच्या साहाय्याने त्यांना कित्येक दिवस अन्नपाण्याशिवाय राहता येते व अशा प्रकारे शरीरधारणेची सोय झाल्यामुळे त्यांना सतत कित्येक दिवस समाधी लावता येते. काही यौगिक क्रियेने योग्यांना मृत्यूही टाळता येतो. त्यामुळे त्या किल्ल्यामध्ये महाभारतकालीन सिद्ध पुरूष समाधी लावून बसलेले योगीराजांना दिसले, या हकीकतीत निदान मला तरी अतिशयोक्ती वाटत नाही. आता अशाच प्रकारची आणखी एक विलक्षण अद्भुत हकीकत पाहू. काही वर्षापूर्वी महात्मा श्रीआनंद महाराज (पूर्वाश्रमीचे श्री. खुशालचंद-संपादक `मिलाप' ) हे देखील अशा सिद्ध पुरूषांच्या दर्शना- साठी केलास व मानस सरोवराच्या प्रदेशात गेले होते. त्या ठिकाणी त्यांना महत्प्रयासाने असे काही विलक्षण सिद्ध पुरूष भेटले. त्यांच्या संबंधीची आश्चर्य- कारक हकीकत त्यांनी एका भाषणात कथन केली होती. त्या वेळी ते म्हणाले- `काही दिवसांपूर्वी मी केलास आणि मानस सरोवर या स्थळांची यात्रा- करून आलो. श्रीकेलास व मानस सरोवर या ठिकाणी जायचे म्हणजे साक्षात् मृत्यूशी खेळण्यासारखे आहे. त्या ठिकाणी इतके भयंकर बर्फ पडते, की तिथल्या बोचऱ्या थंडीत जीव नकोसा होतो. आम्ही ज्या वेळी मानस सरो- वर आणि गौरीकुण्ड येथे पोहोचलो, त्या वेळी तिथल्या भयानक गारठ्यामुळे आमच्या बरोबरच्या एकाही यात्रेकरूनला स्नान करण्याचे धाडस झाले नाही. परंतु मी मात्र तशा थंडीतही स्नान करण्याचे ठरविले. पण माझा तो विचार ऐकूनच कित्येकांना हुडहुडी भरली. माझे सहप्रवासी म्हणाले, `स्वामीजी, कृपा करून अशा थंडीत स्नान करू नका. कदाचित न्यूमोनिया होऊन प्राणांवर बेतेल.' मी म्हणालो, `या पवित्र स्थळी पार्वती मातेने, माझ्या

गौरीमातेने स्नान केले आहे. तेव्हा मी काय वाटेल ते झाले तरी इथे स्नान करणारच ! मला इथे मरण आलेच तर त्यासारखे दुसरे भाग्य नाही.' असे म्हणून मी बर्फाचे थर फोडून कमण्डलूत पाणी भरलं आणि ते खुशाल अंगावर घ्यायला सुरूवात केली. माझं सारं शरीर बर्फासारखंच थंडगार बनलं. बराच वेळ मी जणू निष्प्राण अवस्थेत पडून होतो. त्यानंतर अंगावर ब्लॅकेट ओढून मी तिथेच ध्यान करीत बसलो. त्या वेळी मी ब्रम्हानंदात डुंबत होतो. मनाला विलक्षण शांती वाटत होती. इतका अनु- पमेय आनंद, इतकं विलक्षण सुख मी आजवर कधी अनुभवलंच नव्हतं ! तेवढ्यात गाईडने येऊन मला गदागदा हलविलं. त्यामुळे माझी समाधी भंग पावली. गाईडच्या या कृतीचा मला थोडासा रागच आला. मी त्याला म्हणालो, `मी अनुपमेय सुखसागरात डुंबत असताना मला जागं करायची तुला कुठून दुर्बुद्धी सुचली ?' त्यावर गाईड अपराधी चेहरा करून म्हणाला,`महाराज, आपण या अवस्थेत चांगले सहा-सात तास बसला होता. आता लवकरच काळोख पडू लागेल आणि बर्फ पडायला सुरूवात होईल. तुम्हाला इथेच सोडून गेलो असतो तर कदाचित...' `...मी बर्फ अंगावर पडून मेलो असतो, असंच ना ? पण मित्रा, त्या ब्रम्हानंदापुढे मला मृत्यूची देखील तमा वाटली नसती.' `पण महाराज, तुम्हाला सुरक्षित आणण्याची जबाबदारी मला नको का पार पाडायला ?...' गाईड नम्र स्वरात म्हणाला. त्याचं म्हणणंही खोटं नव्हतं. मी मुकाट्याने उठलो आणि त्याच्याबरोबर चालू लागलो. तेवढ्यात आकाशातून बर्फ पडायला सुरूवात झालीच ! आणि थोड्याच वेळात पांढऱ्या शुभ्र बर्फाने सारा भूप्रदेश चकमकू लागला. `..पुढे एक दिवस मानस सरोवराच्या बर्फमय प्रदेशात फिरता फिरता मला एक अद्भुत दिव्य स्थान दृष्टीस पडले. असे म्हणतात की, याच पवित्र स्थानी बसून भगवान शंकरांनी पार्वती देवीला उपदेश केला. त्या विवक्षित ठिकाणी पोचणं देखील फार कठीण होतं. मार्गात बर्फाचे निसरडे कडे होते. परंतु भगवान शंकरांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या त्या पवित्र स्थळी जाण्याची विलक्षण ओढ होती. त्यामुळे `देह जावो अथवा राहो' या जिद्दीनेच मी निघालो होतो व मोठ्या कष्टाने तिथे जाऊन पोचलो होतो. तिथे बसल्यावर मनाला अनुपमेय शांतीचा लाभ झाला आणि लवकरच माझी समाधी लागली. बऱ्याच वेळाने मी समाधीतून जागा झालो आणि बर्फाचे कडे पार करून तेथून खाली उतरू लागलो. खाली येता येता वाटेत एक मद्रासी साधू बेहोष अवस्थेत पडलेला माझ्या दृष्टीस पडला. तिथल्या विलक्षण थंडीमुळेच त्याची अशी अवस्था झाली होती असं मला नंतर समजलं. तो जगण्याची आशा आता कमीच होती. परंतु प्रयत्न करून पाहावा म्हणून `गाईड' च्या साहाय्याने मी त्याला खाली आणलं आणि अग्नी प्रज्वलित करून त्याचं सारं शरीर अक्षरशः `तापवून' काढलं. आम्हाला त्या ठिकाणी विस्तव करण्यासाठी लाकडं मिळणं कठीणच होतं. कारण त्या बर्फमय प्रदेशात गवताची एक काडी- देखील उगवत नव्हती. त्यामुळे बकरीच्या

वाळलेल्या लेंड्या जाळूनच विस्तव तयार करावा लागला. शरीर चांगले तापून निघाल्यावर तो मद्रासी साधू हळूहळू शुद्धीवर आला.' ते पुढे म्हणतात... `योगी प्रणवानंदजी महाराज या नावाच्या एका महान योग्याचे वास्तव्य मानस सरोवराच्या परिसरात सुमारे 20-22 वर्षे आहे. मी ज्या वेळी त्यांना भेटलो, त्या वेळी त्यांचा चेहरा ओळखीचा वाटला. पूर्वस्मृती चाळवळी गेली आणि एकदम `सोमयाजी' म्हणून हाक मारली. ते नाव ऐकताच ते आश्चर्याने माझ्याकडे पाहू लागले. वीस वर्षापूर्वी आम्ही लाहोरमध्ये एकत्र राहत होतो. त्या वेळी ते राजकारणात होते, परंतु त्या क्षेत्रात नीतिभ्रष्ट लोकांचाच भरणा असल्याचे दिसून आल्यावर त्यांचे मन विटले आणि राजकारणसंन्यास घेऊन ते तडक मानस सरोवरावर आले आणि त्यांनी योगाभ्यासास सुरूवात केली. मी विचारले, `स्वामीजी, आपण या योगाभ्यासातच वीस वर्षात किती प्रगती केलीत ?' त्यावर त्यांनी काही यौगिक क्रिया मला करून दाखविल्या. नंतर प्राणायाम करून ते थोडा वेळ स्तब्ध बसले आणि मग पाहता पाहता त्यांचे शरीर अधांतरी तरंगू लागले. आणि थोड्याच वेळात ते पार खोलीच्या छताला जाऊन भिडले. मी आश्चर्याने थक्क होऊन वर पाहू लागलो. तेवढ्यात योगीमहाराज हळूहळू खाली आले. त्यानंतर त्यांनी योगासंबंधी कित्येक गूढ गोष्टी मला समजावून सांगि- तल्या. परंतु त्या सर्वसाधारण मनुष्यापुढे प्रकट करण्यासारख्या नाहीत. मानस सरोवराच्या यात्रेत मला आणखी एक महान सिद्ध भेटले. त्याचे असे झाले. एके दिवशी संध्याकाळच्या वेळी आम्ही यात्रेकरू तंबूत बसून गप्पा मारीत होतो. मी सहज म्हणालो,` या केलासाच्या परिसरात अनेक देवदेवता नि सिद्ध पुरूष यांचं वास्तव्य आहे असं आम्ही आजवर ऐकत आलो आहोत. परंतु इथं तर एकही सिद्ध पुरूष कसा आढळत नाही ?' माझे हे वाक्य पुरे होण्यापूर्वीच एक जटाधारी योगीराज माझ्यासमोर प्रकट झाले. त्यांच्या सर्व शरीरावर भस्माचे आडवे उभे पट्टे दिसत होते. त्यांचे शरीर अतिशय भव्य आणि तेजःपुज दिसत होते. मी लागलीच पुढे जाऊन त्यांना वंदन केले. त्यावर त्यांनी मला घट्ट आलिंगन देऊन म्हटले, `अहो, या केलास सरो- वरावर अनेक सिद्ध पुरूष तपाचरण करीत आहेत. त्यांना भेटण्याची ज्यांची तीव्र इच्छा असते, त्यांना ते दर्शनही देतात.' एवढे सांगून ते योगीराज पाहता पाहता अदृश्य झाले. हा एखादा भास असावा असेच मला सुरूवातीला वाटले. म्हणून मी टॉर्च आणून सगळीकडे तपासून पाहिले. परंतु ते योगीराज पुन्हा काही माझ्या दृष्टीला पडले नाहीत. परंतु माझ्या कपड्यांवर मात्र भस्माचे डाग दिसत होते. याचाच अर्थ, तो `भास' नव्हता. ती अगदी शंभर टक्के वस्तु- स्थिती होती. दुसऱ्या दिवशी सकाळी मी माझ्या गाईडला हाक मारून विचारले, `शीशखभ्भाजी, (त्या गाईडचं नाव) इथं जवळपास कुणी सिद्ध पुरूष राहतात का ?' त्यावर शीशखभ्भाजी होकारार्थी मान हलवीत म्हणाला,`महाराज, एक महान योगी येथे राहतात खरे, परंतु ते माणसांना खाऊन टाकीत असल्या-

मुळे त्यांच्या भेटीला कुणी जात नाही.' मी म्हणालो,`मला त्यांनी खाऊन टाकलं तरी चालेल. परंतु त्यांच्याकडे मला तू घेऊन चल.' माझी ही विनंती ऐकताच शीशखम्भाजींचे अंग शहारून आले. तो म्हणाला, `महाराज, या बंद्या सेवकाला दुसरी कोणतीही आज्ञा करा, परंतु त्या नरमांसभक्षक योग्याकडे न्यायला सांगू नका.' मी म्हणालो, `तू मला त्यांचे निवासस्थान दुरूनच दाखव. तू स्वतः तिथे ये असं मी म्हणतच नाही.' त्यावर तो डोळे विस्फारीत व खांदे उडवीत म्हणाला,` पाहा बुवा ! तुम्ही आग्रहच करता आहात म्हणून मी दुरूनच त्यांची गुहा दाखवतो. परंतु ...तुमचं काही बरं-वाईट झालं तर त्याची `जिम्मेदारी' माझ्यावर नाही... `ठीक आहे. तू बिलकुल काळजी करू नकोस.' मी म्हणालो. शेवटी शीशखम्भाजीचा अगदी नाइलाज होऊन ती गुहा दाखविण्यासाठी तो माझ्याबरोबर आला व त्याने दुरूनच बोट दाखवून मला म्हटले, `ते दोन भव्य दगड पडलेले दिसतात ना, त्यांच्याच आतल्या गुहेत ते सिद्ध पुरूष तपश्चर्या करीत बसलेले आहेत. ते दगड बाजूला सारून तुम्ही आत जा नि त्यांचं दर्शन घ्या. तुम्ही परत जिवंतच बाहेर याल याची हमी मात्र मी घेत नाही.' शीशखम्भाजीचा निरोप घेऊन मी जवळजवळ पळतच त्या विवक्षित दगडांजवळ आलो. तेथे सर्वत्र बर्फाचे ढीग साठले होते. त्यामुळे ते दगडही नीट दिसत नव्हते. मी महत्प्रयासाने ते दगड बाजूला केले आणि आत एक भव्य गुहा माझ्या दृष्टीस पडली. माझा आनंद गगनात मावत नव्हता. मी त्याच आनंदात त्या गुहेत शिरलो. थोड्याच अंतरावर एक सिद्ध पुरूष मांडी घालून बसलेले माझ्या दृष्टीस पडले. हे काल संध्याकाळी भेटलेलेच सिद्ध पुरूष आहेत हे मी लाग- लीच ओळखले आणि त्यांना नम्रपणे लवून नमस्कार केला. मला पाहून योगीराजांना आनंद झालेला दिसला. त्यामुळे माझ्याही जिवात जीव आला. नंतर त्यांनी मला जवळ बोलावून माझी विचारपूस केली व माझ्याशी पुष्कळ विषयांवर चर्चा केली. त्यांचे सर्व विषयांतील अगाध ज्ञान व बोलण्यातील मृदुता व गोडवा पाहून मला आश्चर्याबरोबर आनंदही झाला. त्यांचा निरोप घेताना मी विचारले,`महाराज, आपल्या भेटीस जी माणसं येतात त्यांना आपण खाऊन टाकता, असं मी जे मघा ऐकलं ते खरं का ?' त्यावर ते हसून म्हणाले,`अहो, माणसं खायला मी काय राक्षस स आहे ? माणसांचा उपद्रव टाळण्यासाठी अशी काहीतरी भीती आम्हाला उत्पन्न करावी लागते.' त्या योगीराजांनी सांगितलेल्या कित्येक गोष्टी गूढ व विलक्षण आहेत. परंतु त्या सर्वसामान्य मनुष्याजवळ प्रकट करण्यास त्यांची मनाई असल्यामुळे मी त्या सांगू शकत नाही. मी बराच वेळ त्यांच्याशी नाना विषयांवर चर्चा करीत होतो. तेवढ्यात ते मध्येच म्हणाले,`तुम्ही आता निघा. तुमचे मित्र तुम्हाला हाका मारीत आहेत.' मी विचारले, `महाराज, ही गोष्ट आपल्याला इथे बसून कशी समजली ?' त्यावर ते हसून म्हणाले, `काल संध्याकाळी इथे बसून जसं तुमचं संभा- षण मी ऐकलं व तुझा भ्रम पुरा करण्यासाठी तुला दर्शन दिलं, अगदी तसंच ! भूत,भविष्य आणि वर्तमान

काळातील कोणतीही घटनवा माझ्यापासून लपून राहू शकत नाही. इथे बसून इंग्लंड-अमेरिकेतील घटना आम्ही पाहू शकतो.' त्या त्रिकालज्ञ महापुरूषाला मनोमन वंदन करून मी त्यांचा निरोप घेतला आणि त्या गुहेतून बाहेर पडलो. त्या वेळी बाहेर माझे मित्र सचिंत  होऊन खरोखरच मला हाका मारीत होते.' श्री आनंदस्वामीजी पुढे म्हणतात, `माझ्या या दीर्घकालच्या यात्रेत मला काही बौद्ध साधूही भेटले. हे साधू `तामसिक सिद्ध' असून ते कच्चे मांस खाऊन राहत असत. येथे राहणारे काही लामा योगी मात्र मांसाहार अजिबात करीत नाहीत. त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झालेल्या असून योगमार्गात त्यांनी कल्पनातील प्रगती केलेली आहे. अशा एका लामा योग्याची व माझी सुदेवाने गाठ पडली. परंतु आम्हा दोघांना एकमेकांची भाषा समजत नसल्यामुळे मी एका दुभाष्याला बोला- वून घेतले, परंतु अत्यंत पवित्र व गूढ अशा योगविद्येची रहस्ये त्या अन- धिकारी दुभाष्यासमोर प्रकट करण्यास तो योगी मुळीच तयार होईना. त्यामुळे मी एका मौलिक चर्चेला मुकलो. परंतु माझी जिज्ञासा जाणून त्याने काही विलक्षण अद्भुत अशा यौगिक क्रिया मला करून दाखविल्या आणि शेवटी प्राणायामाच्या द्वारे आपले शरीर विशिष्ट प्रकारे फुगवून त्याने ह्दयाजवळ वास करणाऱ्या अत्यंत तेजःपुज अशा अंगुष्ठाएवढ्या जीवात्म्याचे मला दर्शन घडविले ! त्या दर्शनाने माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. ऋषिकेशपासून पुढे सर्व हिमालयभर अनेक सिद्ध पुरूष व महान योगी राहतात. त्यांच्या भेटीची ज्यांना तीव्र तळमळ असेल त्यांना त्यांचे दर्शन निश्चितपणे होते यात तिळमात्र संशय नाही, असे मी माझ्या स्वतःच्या अनुभवावरून ठामपणे सांगू शकतो.'

मृत्यूच्या वेळी मनुष्याला परलोकात नेण्या- साठी देवदूत येतात ही गोष्ट कदाचित तुम्हाला `भाकडकथा' वाटेल , परंतु अण्णांना पर- लोकात नेण्यासाठी चक्क एक देवदूत एक दिवस त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला ! ४. अण्णांना खराखुरा देवदूत भेटला ! मनुष्याच्या मृत्यूच्या वेळी नेमके काय घडत असावे ? प्रत्येक मनुष्याला हा प्रश्न केव्हा ना केव्हा पडत असलाच पाहिजे, अशी माझी खात्री आहे. कारण, प्रत्येकालाच हे जड शरीर टाकून देऊन एक दिवस हा इहलोक सोडायचा आहे आणि पूर्णपणे अज्ञात अशा नव्या लोकात प्रवेश करावयाचा आहे. मनुष्याचे मृत्यूनंतरचे अस्तित्व आता पाश्चात्त्य संशोधकांनी देखील मान्य केले आहे. हिंदू धर्म तर स्पष्टच सांगतो की, मृत्यू म्हणजे केवळ अवस्थांतर आहे ! पण हा झाला मृत्यूनंतरचा विचार. परंतु जीवन आणि मृत्यू या दोहोंच्या सीमार रेषेवर नेमके काय घडते हे आज मला वाचकांपुढे मांडायचे आहे, आणि तेही अलीकडेच घडलेल्या एक सत्यकथेच्या आधारे. ती हकीकत आता सविस्तर सांगतो. पुण्यात अण्णा केळकर या नावाचे एक वयोवृद्ध गृहस्थ माझ्या ओळखीचे आहेत. मी अधूनमधून त्यांच्या घरी गप्पा मारण्यासाठी जात असतो. एक दिवस मी असाच त्यांच्याकडे गेलो. त्या वेळी अण्णा कॉटवर पडलेले होते. अधूनमधून कण्हत होते. मला पाहताच त्यांना आनंद झाला. ते किंचित बसते झाले. `तुम्ही आलात हे फार बरं झालं.' ते क्षीण स्वरात म्हणाले. `तुम्हाला एकाएकी कसला आजार उद्भवला ?' मी शेजारच्याच खुर्ची- वर स्थानपन्न होत विचारलं. अण्णा किंचित खोकत म्हणाले, `अहो काय सांगायचं ! परवाच्या एक जानेवारीपासून हातपायांना अचानक सूज येऊ लागली. कल्पनेबाहेर अशक्त- पणा वाटू लागला. डॉक्टरांनी हा `अ‍ॅनिमिया' असल्याचं सांगितलं व त्याप्रमाणे उपचार सुरू झाले. परंतु अपेक्षेप्रमाणे गुण काहीच येत नव्हता. हातापायांची सूज तशीच कायम होती. चार पावलं चालत जाण्याचीही ताकद उरली नव्हती. `एक दिवस निराश मनाने असाच छताकडे पाहत कॉटवर पडून होतो. मनात नाना प्रकारचे विचार सुरू होते. तेवढ्यात सात-आठ वर्षांपूर्वी वाळंबे नावाच्या एता ज्योतिष मित्राने माझ्याबद्दल सांगितलेलं एक भविष्य मला आठवलं. 'वाळंबे उत्तम साधक होते. त्यांच्या वाचेला सिद्धी होती. कधी लहर लागली तर पत्रिका पाहून ते एखाद्याचं भविष्य सांगत आणि मुळातच वाचासिद्धी असल्याने ते जे सांगत तसं हमखास घडत असे !' घोटभर पाणी पिऊन अण्णा क्षीण आवाजात पुढे म्हणाले, `सात-आठ वर्षांपूर्वी मी आजच्यासारखाच गंभीर आजारी पडलो होतो. त्या आजारातून आपण सहीसलामत उठू अशी अंधुकशी आशाही मला वाटत नव्हती. पण `एक दिवस वाळंबे अचानक माझ्या घरी आले. माझी खालावलेली तब्येत पाहून त्यांनी माझी पत्रिका मागून घेतली व थोडा वेळ तिचा अभ्यास करून ते म्हणाले, `अण्णा, तू मुळीच काळजी करू नकोस. या आजारातून तू खडखडीत बरा होशील ! फक्त त्यासाठी एक गोष्ट करायची.' `तो कोणती ?' मी उत्सुकतेने विचारलं. `मृत्युजंय

जपाचे कडकडीत अनुष्ठान !' `पण ते मी कसं करणार ?' `मी करीन. तुला काळजी कशाला ?' वाळंबे नाकावरचा चष्मा खिशात ठेवीत म्हणाले. आणि त्यांनी माझ्यासाठी खरोखरच `मृत्युंजय जपाचे ' अनुष्ठान करावयास सुरूवात केली. आणि दोनच आठवड्यांत मी खडखडीत बरा झालो. मृत्युंजय जगाच्या सामर्थ्याविषयि मी इतके दिवस नुसते ऐकत होतो, परंतु आज त्याबद्दल खात्रीच पटली. माझा निरोप घेताना वाळंबे म्हणाले, `अजून आठ वर्षांनी तुला ह्याच आजार होईल ! परंतु त्या वेळेसही घाबरायचं नाही. कुणाकडून तरी मृत्युं- जय जपाचं अनुष्ठान आणि त्याच्याच जोडीला श्रीगणेश अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तनं करून घ्यायची. तू पुन्हा बरा होशील.' `त्याही वेळेस तूच हे काम कर की !' मी त्याला म्हणालो. त्यावर तो क्षणभर गंभीर झाला आणि मग खिन्नपणे हसून म्हणाला, `अण्णा, त्या वेळी...मी...या जगात नसेनही कदाचित ...!' `त्याचे हेच अखेरचे शब्द ! एवढे बोलून तो जो निघून गेला तो पुन्हा कधीच माझ्याकडे आला नाही...आणि पुढे तो खरोखरच देवाघरी निघून गेला...' त्या आठवणीने अण्णांचे डोळे पाणावले. पुन्हा घोटभर पाणी पिऊन घसा ओला करीत ते पुढे म्हणाले, `त्या माझ्या मित्राने वर्तविल्याप्रमाणे मी पुन्हा 7-8 वर्षांनी खरोखरीच आजारी पडलो. परंतु मी याही आजारातून बरा होणार, असे भाकित त्याने केले होते व त्यामुळेच खरे तर माझी इच्छाशक्ती वाढून तिच्या बळावर मी आज जिवंत दिसतोय !...माझा आजार एक जानेवारीपासून हळूहळू वाढू लागला व मला एक दिवस वाळब्यांनी सांगितलेलं ते भविष्य आठवलं. आणि मी लगेच माझ्या काही मित्रांना बोलावून त्यांना माझ्यासाठी मृत्युं- जय जप आणि सहस्त्रावर्तने करण्याची विनंती केली. त्या मित्रांनी माझ्या- साठी ती अवघड कामगिरी आनंदाने शिरावर घेतली व लगेच एका शुभ- मुहूर्तावर संकल्प सोडून ते अनुष्ठानाला बसलेदेखील ! असेच चार-पाच दिवस गेले. त्या अनुष्ठानाचा परिणाम म्हणूनच की काय, माझ्या प्रकृतीत किंचिंत सुधारणा झाली. परंतु अजूनही मी धोक्याच्या रेषेच्या आतच होतो. आणि त्यानंतर एक अत्यंत विलक्षण, खरोखरच आश्चर्यकारक म्हणता येईल असा अद्भुत प्रकार घडला. अजूनही त्या प्रसंगाच्या आठवणीने अंगावर शहारे येतात. छातीत धडधड सुरू होते आणि अंगाला घाम येतो. खरोखर ! किती विलक्षण प्रसंग तो !' खोलीत पूर्ण शांतता होती. अण्णा आता कोणता प्रसंग सांगणार हे ऐक- ण्यासाठी मी कमालीचा उत्सुक झालो होतो. तेवढ्यात अण्णांनी गरम पाण्याचा पेला पुन्हा तोंडाला लावला. माझी उत्सुकता उगाचच ताणली जात होती...नको तितकी ! ...फडक्याने तोंड पुसत अण्णा क्षीण आवाजात पुढे म्हणाले- `त्या दिवशी दुपारची वेळ होती. खोलीत पूर्ण शांतता होती. मी स्वामी समर्थाचा (श्री अक्कलकोट स्वामीमहाराजांचा) जप करीत माझ्या कॉटवर पहुडलो होतो. स्वामींच्या नावाचा जप मला नेहमीच मोठा आधार वाटतो. कारण स्वामी हेच माझे सर्वस्व आहे. माझं जीवनपुष्पच मी त्यांच्या चरणी वाहून टाकलं आहे. ...हा जप

मनातल्या सुरू असतानाच कुणीतरी मला स्पर्श केल्याचा भास झाला. मी खाडकन डोळे उघडले... आणि ...आणि.. समोर काय पाहिलं मी, ठाऊक आहे ? ताडामाडाएवढी एक उंच व्यक्ती ! त्या व्यक्तीने भगवी वस्त्रं परिधान केली होती. तिचा वर्ण गौर, तेजस्वी होता. त्या व्यक्तीने दाढीमिशा वाढ- विलेल्या होत्या व तिच्या डोक्यावर साधूप्रमाणे जटा होत्या. त्या अनोळखी, उंच व्यक्तीकडे पाहून मी चांगलाच विचारात पडलो. कोण असेल ही व्यक्ती ? आणि ही माझ्याकडे का आली ? चेहरा तर मुळीच ओळखीचा वाटत नव्हता. शेवटी न राहून मी विचारले, `कोण आपण ?' त्यावर ती गूढ व्यक्ती प्रथम शुद्ध संस्कृत भाषेत म्हणाली, `मी देवदूत आहे. तुला नेण्यासाठी आलो आहे. तुझं आयुष्य संपलं आहे...चल माझ्या- बरोबर...' एवढे बोलून त्या व्यक्तीने हातातला पाश मला दाखवीत म्हटले,`हा बघितलास पाश ?' त्या गूढ व्यक्तीच्या रूपाने साक्षात मृत्यूच माझ्यासमोर उभा होता ! खरे तर त्या वेळी माझी भीतीने गाळण उडायची- परंतु स्वामीकृपेने माझा धीर सुटला नाही. त्यांचे चिंतन करून मी मोठ्या धेर्याने त्याला म्हणालो, `मला महामृत्यू येणार असेल तर तू मला खुशाल घेऊन चल. परंतु हा अप- मृत्यू असेल तर टाळण्यासाठी मी जरूर ते अनुष्ठान सुरू केले आहे. तेव्हा मला न्यायचे की नाही ते नीट विचार करून ठरव आणि पुन्हा ये.' माझ्या तोंडून हे शब्द जणू स्वामी समर्थच बोलले, असे मला निश्चित वाटते. कारण मला स्वतःला ते उच्चारण्याचे धेर्य मुळीदेखील झाले नसते. माझे ते सडेतोड उत्तर ऐकून तो देवदूत काहीसा चिडून म्हणाला, `ठीक आहे. योग्य वेळी येईन पुन्हा.' हे त्याचे शेवटचे शब्द.ते मात्र त्याने शुद्ध मराठीच उच्चारले. आणि दुसऱ्याच क्षणी तो दिसेनासा झाला. तो जागच्या जागी अदृश्य झाला की सरळ दारातून निघून गेला, हे आता मला नीटसे आठवत नाही.' एवढा वेळ सतत बोलत राहिल्याने अण्णांच्या घशाला कोरड पडली होती, म्हणून त्यांनी पाण्याचे भांडे पुन्हा तोंडाला लावले. -आणि मी इकडे विचारचक्राच्या भोवऱ्यात सापडलो. एवढी विलक्षण, अंगावर रोमांच उभे करणारी सत्यकथा मी अद्याप ऐकली नव्हती. मनुष्याच्या मृत्यूच्या वेळी त्याला परलोकात घेऊन जाण्यासाठी खरोखरच देवदूत(किंवा यमदूत) येत असतील का ? पुराणकथांत तसा उल्लेख आहे खरा. सती सावित्रीच्या पतीला मृत्यू आला, त्या वेळी त्याला नेण्यासाठी साक्षात यमच रेड्यावर बसून आला होता, ही कथा प्रसिद्धच आहे. मग ती खरी म्हणायची का ? अण्णांनी सांगितलेल्या त्या विलक्षण हकीकतीवरून ती खरी म्हणणे भाग आहे, व तसा पुरावाही अलीकडे शास्त्रज्ञांना सापडला आहे. हे परलोकातील दूत मृत मनुष्याचे परलोकातील मार्गदर्शक असतात. परलोक हा इहलोकापेक्षा फारच-अगदी शतपटीने सुंदर आहे असे म्हणतात. तेथे नव्यने प्रवेश करणाऱ्या सूक्ष्म देहधारी जीवनाला तेथील सर्वच गोष्टी अज्ञात असतात. तेथले नियम त्याला ठाऊक नसतात. अशा वेळी त्याला योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी या दूतांची योजना केलेली असते. (काही वेळा

मृत्युलोकातून परलोकात गेलेले त्याचे सोबतीही त्याला हे मार्गदर्शन करतात). अण्णांना भेटलेल्या देवदूतासंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी मी अण्णांना काही प्रश्न विचारले. माझ्यातला लेखक आता चांगलाच जागा झाला होता. मी विचारले, `अण्णा, तो देवदूत साधारण किती उंच होता हो ? ' `त्याची उंची खूपच होती. साधारण सात-साडेसात फूट नक्कीच असेल.' अण्णा उत्तरले. `तो अगदी हुबेहूब माणसासारखाच दिसत होता, की काही वेगळा ?' माझा पुढचा प्रश्न. `तो अगदी हुबेहूब माणसासारखाच होता. काही फरक नाही. फक्त तेजस्वी आणि मघा सांगितल्याप्रमाणे जास्त उंच, एवढाच फरक.' `त्याचे शरीर कसे होते ? घन की विरल ?' `अगदी घन स्वरूपात होता तो. धुक्यासारखा विरल नव्हता.' `तो अधांतरी उभा होता की त्याचे पाय जमिनीला टेकले होते ?' `अं...तेवढं बाकी आठवत नाही पक्कं. पण तो अधांतरी नसावा...' `ती सारी घटना आपण प्रत्यक्ष जागेपणी पाहिली, स्वप्नात नव्हे, याबद्दल शंभर टक्के खात्री आहे तुमची ? नाही तर तापामध्ये भासबीस झाला असेल कदाचित...' `छे हो ! तो भास मुळीच नव्हता. स्वप्न तर नव्हतंच नव्हतं. त्याला अगदी स्पष्ट पाहिली मी. तुम्ही बसला आहात ना, तिथंच तो उभा होता. त्याचं डोकं पार छताला टेकलं होतं...' `त्याचं पुन्हा कधी दर्शन ?' `नको रे बाबा ! तो कधी न आलेलाच बरा !' अण्णा हसत म्हणाले. त्या दिवशी घरी आल्यानंतर `स्वर्गदर्शन' या नावाचे एक पुस्तक योगा- योगाने माझ्या हातात आले. त्यामध्ये Asttral Projection(जिवंतपणीच सूक्ष्म देहाने जड देहाबाहेर पडणे) यासंबंधी बरेच आश्चर्यकारक अनुभव दिलेले आहेत. या पुस्तकाचे लेखक आहेत पुरीचे शंकराचार्य पूज्यनाद ल्वामी योगेश्वरानंद तीर्थ. हे पुस्तक एका इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आहे. आता प्रस्तुतच्या पुस्तकातील या संदर्भातील काही अनुभव वाचकांपुढे मांडतो. पृष्ठ 70-71 वर मिसेस स्मिथ या बाईचे एक विस्मयकारक उदाहरण दिलेले आहे ते असे- ती स्त्री लिहिते- `माझ्या विचित्र स्वभावाने व डोक्यात भ्रमाची एक वृत्ती आल्यामुळे मी क्लोरोफॉर्म उगीचच घेतला...(त्या वेळी) माझ्या पाय- गती व उशागती दोन देवगण उभे आहेत असे मला दिसले. त्यांनी मला अशा चमत्कारिक जागी नेले, की तेथील तेजस्वी वस्तू पाहून मी घाबरूनच गेले. मला त्या वेळी इतका हर्ष झाला, की आता येथून परत जाऊच नये असे वाटले. परंतु माझ्याभोवती बसलेली मंडळी मी घाबरलेली पाहिली, त्यांची मला कीव आली व मी परत आले...असे प्रयोग करीत असता मला नेहमीच देवदूत भेटतात व मला दिव्य लोकात फिरवून आणतात.' अशाच प्रकारचा एक विस्मयकारक अनुभव आइसलण्डमधील मिस्टर इनारसन या नावाच्या एका गृहस्थाने दिलेला आहे. तो असा- मि. इनारसन हा गृहस्थ मच्छीमारीचा धंदा करीत असे. एक दिवस रात्री झोपी जाण्याच्या वेळी कोणीतरी आपल्या दिशेने येत आहे असे त्यास वाटले. त्याने इनारसनला नमस्कार केला. तो गृहस्थ अतिशय प्रेमळ दिसत होता. तरी पण त्याला पाहून

इनारसनला थोडी भीतीच वाटली. इनारसनची ही अवस्था त्या मनुष्याला समजली असावी. त्यामुळे तो त्याला धीर देत म्हणाला, `तुम्ही मुळीच घाबरू नका. या पृथ्वीवरील लोकांना मृत्यूनंतर ज्या लोकात जावे लागते त्या लोकाची माहिती देण्याचे काम मी करीत असतो.' नंतर त्या मनुष्याने इनारसला आपल्याबरोबर येण्यास सांगितले. तेव्हा इनारसनला वाटले की, आपण याच्याबरोबर गेलो की परत भूतलावर येणार नाही. म्हणून तो कांकू करू लागला. परंतु नंतर त्याची समजूत पटली व तो त्या मनुष्याबरोबर निघाला. त्या वेळी त्याचे शरीर त्याला कापसाप्रमाणे हलके झाल्यासारखे वाटले. नंतर ते थोडे हवेतून तिरप्या रेषेने वर चढू लागले. इनारसन लिहितो, `त्या वेळी मी वाटेत काय काय पाहिलं हे सांगण्यास मजजवळ शब्दच नाहीत.' त्यानंतर ते दोघे इनारसनच्या घराजवळ आले. त्या वेळी तो देवदूत म्हणाला, `आता तू आपल्या स्थूल शरीरात परत जा.' एवढे बोलून तो देवदूत अदृश्य झाला आणि इनारसन आपल्या स्थूल देहात जागा झाला. अशाच प्रकारची आणखीही काही उदाहरणे या पुस्तकात वाचावयास मिळतात. स्थूल देहातून बाहेर पडल्यानंतर बहुतेक मंडळींनी आपल्याला असे मार्ग- दर्शक देवदूत भेटल्याचे सांगितले आहे. पृष्ठ 121 वर मिसेस व्ही.एफ्. या स्त्रीचा असाच एक अनुभव दिलेला आहे. 1938 साली एके दिवशी सकाळी ती आपल्या घराच्या दुसऱ्या मजल्या- वरील एका खओलीत बसली होती. त्या वेळी तिच्या पाठीमागे एक सुंदर आकृती उभी असल्याचे तिच्या लक्षात आले. ती आकृती त्या स्त्रीला म्हणाली, `मी तुला तुझ्या स्थूल देहाबाहेर घेऊन जाऊन स्वर्ग म्हणजे काय हे तुला दाखवितो.' त्या आकृतीने एवढे म्हटल्याबरोबर मिसेस व्ही.एफ्. चा सूक्ष्म देह एका- एकी स्थूल देहातून बाहेर पडू लागला. त्यानंतर त्या मार्गदर्शक आकृतीने मिसेस व्ही.एफ्.ला हवेतून बाहेर (ईथरची मर्यादा ओलांडून त्यापलीकडील लोकात) नेले. त्या ठिकाणी मिसेस व्ही. एफ्.ला अतिशय सुंदर बागा व कधीही न कोमेजणारी फुले दिसली. त्याचप्रमाणे तालबद्ध संगीतही ऐकू आले. तेवढ्यात त्या सुंदर आकृतीने मिसेस. व्ही.एफ्.ला विचारले, `आता तुला समाधान वाटते काय ?' एवढे विचारल्यानंतर थोड्याच वेळात त्या आकृतीने व्ही.एफ्. ला तिच्या स्थूल देहाजवळ नेले व `अजून तुझी तयारी झालेली नाही' असं म्हणून ती आकृती एकाएकी अदृश्य झाली व त्याच वेळी मिसेस व्ही.एफ्. तिच्या स्थूल शरीरात जागी झाली. या उदाहरणात मिसेस व्ही.एप्. ला भेटलेली ती सुंदर आकृती म्हणजे देवदूतच असली पाहिजे. वर मिसेस कानेली या स्त्रीचा असाच एका विलक्षण अनुभव सांगण्यात आला आहे. तिनेही असे स्पष्ट सांगितले आहे की, स्थूल देह सोडून मी प्राणमय कोषाने ज्या वेळी अंतराळात फिरू लागले त्या वेळी आपल्या- बरोबर दिव्य लोकातील काही मार्गदर्शक होते. कित्येकदा Astral projection च्या प्रयोगात हे मार्गदर्शक देवदूत प्रयोग- कर्त्यांना मदत करतानाही आढळून येतात. पृष्ठ 94 वर किरमन नावाच्या एका गृहस्थांना

असे देवदूत भेटल्याची व त्या देवदूतांनी सूक्ष्म देहाच्या बहिर्गमनाच्या वेळी श्री. किरमन यांना मदत केल्याची आश्चर्यकारक हकी- कत दिलेली आहे. मात्र, मृत्यूच्या क्षणी सर्वच माणसांना देवदूत भेटतीलच असे नाही. काहींना केवळ एक प्रकाशशलाका दिसते. डॉ. रेमंड ए. मूडी यांनी लिहि- लेल्या `Life after Life' (मरणोत्तर जीवन) या पुस्तकात अशा प्रका- रचा एक आश्चर्यजनक अनुभव दिलेला आहे. मृत्यूनंतर दिसणाऱ्या काळ्या- कुट्ट अंधारात त्या तेजस्वी प्रकाशशलाकेचं अस्तित्व सूक्ष्म देहाला प्रकर्षाने जाणवतं. ती प्रकाशशलाका तेजस्वीच, परंतु तो प्रकाश प्रखर वाटावा इतकी तेजस्वी नसते. उलट तिचे अस्तित्व किंवा दर्शन आल्हादक वाटते. त्या प्रकाशाची तुलना भूतलावरील कोणत्याही प्रकाशाशी करता येणार नाही. त्या प्रकाशात कोणत्याही व्यक्तीचे दर्शन होत नाही. परंतु प्रकाशाला स्वतःचे अस्तित्व खासच असते. तसेच, प्रकाशाचे किरण आल्हादक व प्रेमपूर्ण असतात. तो प्रकाश सूक्ष्मदेहधारी जीवात्म्याशी शब्दरहित संभाषण करतो. म्हणजेच, त्याला काय सांगायचं आहे ते समजतं, पण ती भाषा शब्दांची नसते. मरणाच्या उंबरठ्याला स्पर्श करून परत आलेल्या काही व्यक्तींनी आपल्याला यमदूत दिसल्याचे अनुभवही सांगितले आहेत. हे यमदूत कसे दिसत असावेत या गोष्टीचे प्रस्तुत लेखकाला अनेक दिवस कुतुहल होते. परंतु एक दिवस स्वप्नात दोन महाभयंकर यमदूतांनी लेखकाला दर्शन देऊन आपले रूप दाखविले. हे यमदूत आठ ते दहा फूट उंच होते व रंगाने काळे कुळकुळीत म्हणजे हुबेहुब कोळशासारखे होते. `कल्याण' मासिकाच्या परलोक आणि पुनर्जन्म विशेषांकात काही लोकांना मृत्यूच्या क्षणी अशाच काळ्याकुळकुळीत, लालबुंद डोळ्यांच्या यमदूतांचे दर्शन झाल्याच्या काही आश्चर्यकारक हकीकती दिलेल्या आढळतात. याचा अर्थ, सर्वच माणसांना मृत्यूच्या वेळी देवदूतच भेटतील असे नाही. काही भाग्यवान पुण्यात्म्यांनाच देवदूत भेट असावेत. इतरांची गाठ यम- दूतांशीच होत असावी ! काही वेळा माझ्या मनात असे प्रश्न येतात, की अण्णांना ज्या वेळी देवदूत भेटला त्या वेळी अण्णांजवळ जर कॅमेरा व टेपरेकॉर्ड असता तर त्या देव- दूताचा फोटो घेणे व त्याचे भाषण `रेकॉर्ड' करणे शक्य झाले असते का ? तसेच आमचे शास्त्रज्ञ पिशाच्चांचे फोटो काढण्यात यशस्वी झाले आहेत, मग त्यांना देवदूतांचे वा यमदूतांचे फोटो काढता येणार नाहीत का ? मला वाटते, शास्त्र इतके झपाट्याने पुढे चालले आहे की एक ना एक दिवस या दोन्ही गोष्टी शास्त्रज्ञ शक्य करून दाखवतील व पुढे पुढे तर परलोकातील व्यक्तींबरोबर फोनवर बोलल्याप्रमाणे संभाषण करणेही सहज शक्य होऊन जाईल. असे खरोखरच झाले तर सध्या मृत्यूबद्दल वाटणारी भीती मनुष्याला वाटणार नाही. व मृत्यू हे केवळ अवस्थांतर आहे, अंगा- तला कोट काढण्याइतकेच जडदेह सोडणे सोपे आहे, अशी माणसाची खात्री होईल. आणि तो दिवस फार दूर आहे, असे मला वाटत नाही. ज्याला अतीद्रिंय शक्ती प्राप्त झाली आहे त्याला जगातील अनेक

अज्ञात घटना समजू शकतात. काही वेळी सामान्य मनुष्यालाही या अतींद्रिय शक्तीचा विलक्षण अनुभव येतो ! 10 होणारे न चुकेल.....! सर्वसामान्य मनुष्याला अतीद्रिंय अनुभव येऊ शकतात का ? -या प्रश्नावर मनुष्याला बाह्य जगाचे ज्ञान होण्यासाठी पाच इंद्रिये दिलेली आहेत. ती म्हणजे त्वचा, नाक,कान, डोळे व जीभ. या इंद्रियांमुळे बाह्य जगाचे ज्ञान होते, म्हणून यांना ज्ञानेद्रिंये असे म्हटले जाते. आता अतीद्रिंय ज्ञान याचा अर्थ, या इंद्रियांच्या साहाय्यविना जे ज्ञान मिळते, ते ! किंवा असेही म्हणता येईल की, या पंचज्ञानेद्रियांच्या नेहमीच्या कुवतीच्या पलीकडे जाऊन ज्या वेळी एखादी गोष्ट मनुष्याला दिसते, समजते किंवा जाणवते त्या वेळी त्या गोष्टीलाही अतीद्रिंय असे नाव देता येईल. प्राचीन भारतात या अतीद्रिंय शक्तीचा किंवा सिद्धीचा शोध घेण्याचे प्रयत्न झाले. भगवान पतंजलींनी या शक्ती म्हणजे ज्ञानेंद्रियांच्या शक्तींचा परमो- त्कर्ष नाही असे स्पष्टपणे सांगितले. म्हणजेच, त्या ज्ञानेद्रिंयाच्या शक्ती- पलीकडच्या आहेत. त्यांच्या या वेशिष्ट्यांमुळेच भौतिक शास्त्रांन त्यांचा उलगडा होत नाही. भौतिक शास्त्रातील प्रसिद्ध संशोधक सर ऑलिव्हर लॉज, क्रुक्स, वॉलेस इत्यादींनीही हे स्पष्टपणे कबूल केले आहे. त्यांच्या मते त्या जर जड (PHysical) असत्या तर त्यांचा शोध किंवा उलगडा भौतिक शास्त्रांनीच करता आला असता. परंतु तसा तो करता येत नाही व म्हणूनच  प्रो. व्हाईन किंवा सर ऑलिव्हर लॉज यांनी या शक्तीचा शोध आध्यात्मिक मार्गानेच लावता येईल, असे आपले मत ग्रंथांतरी नमूद करून ठेवले आहे. या शक्तींना पतंजली `प्रतिभ' म्हणजे अतीद्रिंय असे म्हणतात. (ततः प्रातिभ श्रावण-वेदना-आदर्श-आस्वाद-वार्ता जायन्ते !(विभूतीपाद सूत्र 36) भौतिक शक्तींना `Law of inverse square' चा( दूरांतर सापेक्ष व्यस्त प्रमाणाचा) नियम लागू पडतो. म्हणजे जसजसे अंतर वाढते तस- तसा या भौतिक शक्तींचा परिणाम कमी कमी होत जातो. परंतु `प्रातिम' किंवा `अतीद्रिंय' शक्तींना हा नियम लागू नाही. प्रो. जे बी. व्हाईन हे अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात या अतीद्रिंय शक्तींबाबत( `एक्स्ट्रॉसेन्सरी परसेप्शन') पुरावे गोळा करण्याचे काम करीत असून अशा अतीद्रिंय सिद्धी मनुष्याला (काही वेळा सर्वसामान्य मनुष्यालाही) प्राप्त होऊ शकतात, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. अशा प्रकारचे संशोधन इंग्लंड व अमेरिकेतील `दी सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च' ही संस्था करीत असून त्यासाठी पुढे येणाऱ्या पुराव्याची अतिशय कसून छाननी करण्यात येते. याबाबत `लंडन टाइम्स' ने एकदा लिहिले होते की, या अतीद्रिंय वस्तुशोधक संस्थेची पुरावा गोळा करण्याची पद्धत अशी की, `खुनाबद्दल एखाद्यास फाशी द्यावयाचे झाल्यास जेवढा पुरावा लागेल त्याच्या पाचपट पुरावा या संस्थेला हवा असतो...' अर्थात, संशोधन व तेही प्रामाणिकपणे करावयाचे तर एवढी काळजी घ्यायला हवी ! असो. हे अतीद्रिंय अनुभव साधना मार्गात ज्यांनी पुष्कळ प्रगती केली आहे अशांना अनेकदा येत असलेले आढळतात. परंतु काही वेळा सर्व- सामान्य

मनुष्यालाही त्यांची झलक पाहावयास मिळतेस व ते अतिशय आश्चर्यकारक असल्याने त्याच्या ते कायमचे स्मरणात राहतात. या अतींद्रिय अनुभवांचा एक भाग म्हणजे भविष्यकालीन घटना अगाऊ समजणे, हा होय. वास्तविक भविष्यकाल हा अज्ञात आहे. तो कोणत्याही ज्ञानेद्रियाच्या योगे जाणता येत नाही. परंतु क्वचित प्रसंगी काही अतीद्रिंय अनुभव मिळून आपला किंवा इतरांचा भविष्यकाल स्पष्टपणे पाहता येतो किंवा जाणवतो. या संदर्भात माझा स्वतःचा एक विलक्षण अनुभव वाटकांपुढे ठेवतो... ही घटना 1970 सालातली. महिना जानेवारी आणि दिनांक एकोणीस. स्थळ पुण्यातील शिवाजीनगर एस.टी.स्टँड. यापेक्षा अधिक तपशिलाची आवश्यकता नाही. आता प्रथम थोडी पार्श्वभूमी सांगतो. जानेवारीच्या सात-आठ तारखेच्या सुमारास माझ्या आजेसासूचे कल्याण येथे देहावसान झाले. या आजेसासूंना आम्ही `जिजी' म्हणत असू. जिजींचा पाय एक दिवस कुठे `फ्रॅक्चर' झाला आणि त्या ज्या अंथरूणाला खिळल्या त्या पुन्हा उठल्याच नाहीत. त्यांचे देहावसान झाल्यानंतर एक रीत म्हणून मला कल्याणला जाऊन येणे आवश्यक होते. परंतु काही घरगुती अडचणीमुळे मी त्या वेळी जाऊ शकलो नाही. त्यामुळे मी त्यांच्या तेराव्याला नाशिकला जाण्याचे ठरविले व त्याप्रमाणे 19 जानेवारी 1970 या दिवशी मी सकाळी घरातून आठच्या सुमारास बाहेर पडलो. मला नाशिकला जाण्यासाठी शिवाजीनगरहून एस. टी. होती. म्हणून मी प्रथम बसने शिवाजीनगरच्या एस.टी.स्टॅण्डवर आलो. एस.टी लागायला अजून बराच अवकाश होता, म्हणून मी वर्तमानपत्र वाचीत एका बाकावर बसून राहिलो. आणि त्याच वेळी ती विलक्षण अद्भुत घटना घडली ! मी वर्तमानपत्र वाचीत असताना माझ्या कानात एकाएकी एक वाक्य स्पष्टपणे ऐकू आले... `....तुला आज नासिक सिव्हिल हॉस्पिटल' मध्ये जावे लागेल.' मी एकदम चपापलो ! असा विचित्र अनुभव मला अद्याप आलेला नव्हता. हे वाक्य माझ्या कानांशी येऊन कुणी मोठ्याने ओरडले,अशातला भाग नाही. ते वाक्य बाहेरून आलेच नाही. मात्र, ते मला स्पष्टपणे `ऐकू आले,' एवढे खरे. सुरूवातीला हा काही भास असावा असे वाटून मी त्याकडे दुर्लक्ष कर- ण्याच्या विचारात होतो. परंतु थोड्याच वेळात तेच वाक्य माझ्या कानाशी पुन्हा एकदा ऐकू आले. हा अनुभव खरोखरच विचित्र होता, अभूतपूर्व होता. हा अनुभव खरोखरच विचित्र होता, अभूतपूर्व होता. `नासिक सिव्हिल हॉस्पिटल' चा आणि आपला काय संबंध ? ते हॉस्पिटल गोरे की काळे हेसुद्धा आपण अद्याप पाहिलेले नाही. मग आपणास तिकडे कशासाठी जावे लागणार ? मी हातातले वर्तमानपत्र बाजूला ठेवून देऊन माझ्या मनाशीच विचार करू लागलो. एकदा मनात शंकेची पाल चुकचुकली. कदाचित आपण प्रवास करीत असणाऱ्या एस.टी. ला अपघात वगेरे होऊन तर आपल्याला नासिक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाण्याचा प्रसंग येणार नाही ना ? नाही तर त्या ठिकाणी जावे लागण्यास दुसरे कोणते कारण असू शकणार ? मी मनाशी हा विचार करीत आहे

तोच माझ्या कानाशी ते वाक्य जसेच्या तसे पुन्हा दोन वेळा ऐकू आले- `तुला आज `नासिक सिव्हिल हॉस्पिटल' मध्ये जावे लागेल...' आता मात्र मी पुरताच चक्रावून गेलो ! हा आज काय विलक्षण प्रकार घडतो आहे हे मला समजेना. अशा प्रकारचा विलक्षण अनुभव यापूर्वी कधीच आलेला नव्हता. मी याची कारणपरंपरा शोधण्याचा विचार करीत आहे तोच माझ्या समोर जी एक एस टी. उभी होती त्या एस.टी.च्या टपावर काही हमाल लोक पांढऱ्याशुभ्र गुंडाळ्या(त्यात बहुधा तंबोरे असावेत.) वर चढवीत अस- ल्याचे दृश्य मला दिसले. वास्तविक त्या दृश्यात अशुभ कल्पना चाटून गेली. मला असे वाटले, की जणू एखादे प्रेतच पांढऱ्याशुभ्र कोऱ्या कपड्यांत गुंडाळून एस.टी.च्या टपावर ठेवले जात आहे. माझ्या मनाचे तारू अशा प्रकारे वाटेल तिकडे भरकटत चाललेले पाहून मी त्याला आवर घालण्यासाठी तो विचार तसाच वाऱ्यावर सोडून देऊन हातातले वर्तमानपत्र वाचू लागलो. परंतु थोड्याच वेळात ते पूर्वीचेच वाक्य मला पुन्हा स्पष्टपणे ऐकू आले- `तुला आज `नासिक सिव्हिल हॉस्पिटल'मध्ये जावे लागेल !,' `तुला आज `नासिक सिव्हिल हॉस्पिटल' मध्ये जावे लागेल...' ...मी पुन्हा विचारचक्राच्या भोवऱ्यात सापडलो. हे वाक्य ज्याअर्थी आपल्याला एकसारखे पुनःपुन्हा ऐकू येत आहे, त्या अर्थी त्यात काहीतरी  निश्चित अर्थ असला पाहिजे, असे मला वाटू लागले. तेवढ्यात `बोला साहेब, कुठं जायचं ?' या कंडक्टरच्या वाक्याने व त्याच्या हातातील `पंचिग मशीन' च्या `कट्कट्' आवाजाने मी भानावर आलो. माझ्या विचारांची साखळी मध्येच खळकन तुटली. त्या विचारतंद्रीत एस.टी.ची गाडी केव्हा स्टॅंडवर लागली व माझ्या पुढच्या प्रवाशांना कंडक्टरने केव्हा तिकिटे दिली हेसुद्धा माझ्या लक्षात आले नाही ! मी `एक नासिक' एवढे शब्द उच्चारित हातातील नोट त्याच्या हातात ठेवली व त्याने दिलेले तिकीट व उरलेले पेसे न पाहताच खिशात ठेवून गाडीत येऊन बसलो. कारण त्या विलक्षण अनुभवनाने माझ्या मनावर आपला पगडा इतका बसविला होता, की त्याच एका विचाराव्यतिरिक्त अन्य विचार करायलाच वेळ नव्हता. त्यामुळेच, गाडी सुरू झाल्यावरदेखील माझे विचारच्रक गाडीच्याच वेगाने सुरू होते. हा विचित्र संदेश कुणी दिला ? तो देण्यामागे तो अदृश्य शक्तीचा कोणता हेतू असेल ? आजवर असा संदेश आपल्याला कधीच मिळाला नाही, मग आजच तो मिळण्याचे काय कारण? एक ना दोन, अनेक प्रकारचे प्रश्न माझ्या मनात थेमान घालू लागले. अखेर `तुका म्हणे उगी राहावे, जे जे होईल ते पाहावे' असे सूज्ञपणाचा विचार करून मी हातातील वर्तमानपत्राकडे नजर वळविली. पुढे सहा-सात तासांचा कंटाळवाणा प्रवास केल्यानंतर आमची गाडी एकदाची नासिकला येऊन पोहोचली. या सहा-सात तासांत मात्र तो संदेश मला एकदाही ऐकू आला नाही. नासिकला उतरल्यावर मी आमचे सासरे ज्या ठिकाणी उतरले होते त्याच ठिकाणी जाऊन उतरलो. वास्तविक नासिकला माझी सख्खी बहीण राहत होती. परंतु मी ज्या कामासाठी नासिकला आलो होतो, त्या

कामाच्या सोयीच्या दृष्टीने तिच्याकडे उतरण्यापेक्षा वरील ठिकाणी उतरणेच मी पसंत केले. दुसऱ्या दिवशी सकाळी घाटावर तेराव्याचे धार्मिक संस्कार यथासांग पार पडले. त्यानंतर घरी भोजन झाल्यानंतर थोडी विश्रांती घेऊन मी बहि- णीला व मेहुण्यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. त्या ठिकाणी दोघांचीही गाठ पडली. आम्ही बराच वेळ मनसोक्त गप्पा मारल्या. त्यानंतर त्या दोघांनी मला दुसऱ्या दिवशी सकाळी घरी भोजनास येण्याचे आमंत्रण दिले. खरे तर मी दुसऱ्याच दिवशी पहाटेच्या गाडीने पुण्याकडे परतणार होतो. म्हणून मी मेहुण्यांना म्हणालो, `प्रमोदराव, मी उद्याच्या ऐवजी आज रात्रीच जेवायला आलो तर चालणार नाही का ?' त्यावर ते म्हणाले, `नको, माझा क्लास रात्री नऊ-सव्वानऊपर्यंत चालतो. त्यामुळे रात्री घरी यायला दहा वाजतात.' `मग आजच्या दिवस `क्लास' जरा लवकर सोडा की-` मी तोड काढली. परंतु माझी ती कल्पना प्रमोदरावांसारख्या हाडाच्या प्राध्यापकाला पटणे मुळीच शक्य नव्हते. ते म्हणाले, `तसे नको. परीक्षा जवळ आल्या आहेत. मुलांचे नुकसान होईल. तेव्हा तुम्हीच दुपारच्या गाडीने पुण्याला जा.' त्यांनी एवढे निक्षून सांगितल्यावर माझाही नाइलाज झाला व मी दुसऱ्या दिवशी दुपारच्या गाडीने जाण्याचे नक्की केले व त्या उभयतांचा निरोप घेऊन परत मुक्कामी आलो. वाचकहो, अजून तरी त्या गूढ संदेशाने आपला प्रभाव दाखविला नव्हता. त्यामुळे तो संदेश म्हणजे केवळ काहीतरी भास आहे अशीच मी मनाची समजूत करून घेतली व काहीसा निश्चिंत झालो. परंतु...तो संदेश म्हणजे भास नव्हता, किंवा एखाद्या अज्ञात शक्तीने मारलेली ती `लोणकढी थाप' नव्हती. कारण थोड्याच कालात त्या विचित्र संदेशाची पूर्ण प्रचीती मला आली ! तो साराच इतिहास अतिशय दुःखदायक आहे. परंतु मन घट्ट करून तो मी तुम्हाला सांगणार आहे. त्याचे असे झाले- ...त्या दिवशी रात्री भोजन आणि गप्पा उरकून मी रात्री अकराच्या सुमारास झोपी गेलो. माझा डोळा जेमतेम लागला असेल नसेल तोच दारावर कुणाची तरी जोरदार थाप पडली. मी दचकून उठून दार उघडले. -बाहेर आमच्या सौ.चे.मामा उभे होते. त्यांचा चेहरा चिंताग्रस्त आणि भेदलेला दिसत होता. त्यांच्या चेहऱ्यावरचे ते खिन्न भाव पाहून मी चांगल- लाच चपापलो. काही तरी गंभीर प्रसंग समोर उभा आहे हे मी ओळखले. तेवढ्यात ते घाबऱ्या घाबऱ्या म्हणाले, `प्रमोदरावांना अपघात झालाय. चला लवकर !' `म्हणजे ?' सर्वांनी एकदम विचारले. `नासर्डी पुलावर त्यांची मोटार-सायकल पेटून त्यात ते भाजले आहेत.' `पण ते आता कुठे आहेत ?' मी घाबऱ्या घाबऱ्या विचारले. `सिव्हिल हॉस्पिटलात !' `काय, सिव्हिल हॉस्पिटलात ?' माझ्या तोंडून नकळत प्रशअन बाहेर पडला. `होय. आणि आपल्याला आता तिकडेच गेले पाहिजे.' मामा म्हणाले. नंतर आम्ही सारेजण मिळेल त्या वाहनात बसून नाशिकच्या `सिव्हिल हॉस्पिटल'कडे धावलो. एका कॉटवर प्रमोदराव विव्हळत होते. सारखे पाणी मागत होते. त्यांचे जवळजवळ सत्तर टक्के

शरीर भाजल्यामुळे कोळशाप्रमाणे काळे ठिक्कर पडले होते. अंगावरची कातडी जागोजाग बाहेर लोंबत होती. एखादे वांगे भाजून काढल्यावर जसे दिसेल तसे त्यांचे शरीर दिसत होते. ते दृश्य पाहून आम्ही तर गपकन डोळेच मिटून घेतले. काय झाले हे ! प्रमोदरावांसारख्या गुणी माणसावर एवढी भयानक आपत्ती एकाएकी कशी कोसळली ? अधिक चौकशी केल्यावर असे समजले की, त्याच दिवशी संध्याकाळी `क्लास' संपवून प्रमोदराव नव्यानेच विकत घेतल्या आपल्या `राजदूत' मोटारसायकलने नाशिक रोडहून घराकडे परत येत होते. वाटेत नासर्डी पुला- जवळ एक गाढवाला वाचविताना त्यांची गाडी स्लीप झाली व शॉर्ट-सर्किट  होऊन तिने पाहता पाहता पेट घेतला. त्या वेळी प्रमोदराव शिताफीने दूर पळाले. परंतु नंतर पेटती गाडी विझविण्याची दुर्बुद्धी त्यांना झाली व त्या प्रयत्नात त्यांच्या कपड्यांनी पेट घेतला व त्यांचे सारे शरीर भाजून निघाले. दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. एम. एस्सी.त पहिल्या वर्गात पहिले येण्याचा बहुमान पटकावणाऱ्या एका अत्यंत हुशार व गुणी माणसाचा अशा प्रकारे दुर्देवी अंत झाला... थोड्या दिवसांपूर्वी त्यांनी `स्वप्न' नावाची एक नाटिका बसविली होती. त्यांचे स्वतःचे जीवनदेखील एखाद्या क्षणभंगुर स्वप्नाप्रमाणेच ठरले. आदल्याच दिवशी नवी घेतलेली `राजदूत' मोटार-सायकल त्यांनी किती उत्साहाने मला दाखविली होती ! परंतु अखेर `राजदूत' `यमदूत' ठरली. ज्या दिवशी अपघात झाला त्या दिवशी क्लासमधले दिवे एकाएकी माल- वले होते, परंतु प्रमोदरावांना `क्लास' बंद ठेवला नाही. तशा अंधारात मेणबत्त्या लावून त्यांनी मुलांना ज्ञानामृत पाजले. हा सारा खटाटोप मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून होता. ..स्मशानभूमीतून घराकडे परतत असताना त्यांच्या या सगळ्या आठ- वणींनी मनात गर्दी केली. आणि त्याबरोबर त्या विचित्र संदेशाचीही पुन्हा आठवण झाली... `तुला आज `नाशिक सिव्हिल हॉस्पिटल ' मध्ये जावे लागेल...' आणि त्याच वेळी एस.टी. च्या टपावरील पांढऱ्याशुभ्र गुंडाळ्याचे दृश्यही डोळ्यांपुढे एकसारखे तरळू लागले. कारण प्रमोदरावांचा मृतदेहही तशाच पांढऱ्याशुभ्र कापडात गुंडाळून मोटारीतून प्रथम घराकडे व नंतर स्मशानभूमीकडे नेण्यात आला होता...त्या दृश्याचा आणि या घटनेचा अगदी निकटचा संबंध नव्हता का ? या सर्व घटनेचा मी जेव्हा जेव्हा विचार करू लागतो, त्या त्या वेळी माझ्या मनात अनेक प्रश्नांचे काहूर माजते. तो चमत्कारिक संदेश मला कुणी दिला ? तो देण्यामागे त्या अज्ञात शक्तीचा कोणता हेतू असावा ? तो संदेश मला अस्पष्ट किंवा अर्धवट स्वरूपातच का मिळाला ? काही वेळा उगाचच असे वाटते की, तो संदेश व्यक्तीच्या नावासकट  पूर्ण स्वरूपात स्पष्ट असा मिळाला असता तर एका ऐन उमेदीतल्या विलक्षण बुद्धिवान व कर्तृत्ववान व्यक्तीला आपण वाचवू शकलो असतो...एका निष्पाप तरूणीचे वेधव्य आपल्याला टाळता आले असते. तिच्या चिमुरड्या तीन गोंडस मुलांचे पितृछत्र आपल्याला त्यांच्या शिरावर शाबूत ठेवता

आले असते.. पण...या झाल्या `जर तर ' च्या गोष्टी. आणि जीवनात या जर तर च्या `जरतारी' शब्दांना काडीचीही किंमत नाही... कारण...होणारे न चुकेल जगती ये ब्रम्हा जरी आडवा ...!!

* ---------------------------------------------------------end-------------------